|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ३ | सोमवार दि. १० जानेवारी २०२२ ते रविवार दि. १६ जानेवारी २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पैशापुढे आजकाल दोस्ती यारी कुठली २०० रुपयांसाठी आयुष्याची दोरी तुटली

मिरज/क्राईम रिपोर्टर



आजकाल पैसा असेल तर सर्व काही आहे. पैशासाठी माणूस काहीही करायला तयार होतो. त्यातच कोरोनाच्या संकटकाळात सगळ्यांचीच आर्थिक स्थिती खालावलेली असल्याने कुणी कुणाला उसने पैसे देत नसे आणि एखाद्याकडे कामाचे पैसे जरी राहिलेले असले तरी ते पैसे जास्त दिवस ठेवायला कुणी तयार नसतात. फेरीवाल्यांचे पॅकिंगचे काम ...पान २ वर

## पतीला सोडून आलेल्या मुलीमुळे माहेर उद्ध्वस्त झाले विरोध करणाऱ्या बापाला आईच्याच मदतीने ठार केले

कल्याण/क्राईम रिपोर्टर



मयत कॉन्स्टेबल बोरसे

कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण करताना समाजाच्या सुरक्षेची काळजी वाहणारा पोलीस आज स्वतः किती असुरक्षित आहे याची इतरांना कल्पना येणार नाही. कारण समाजाचा पोलिसांकडे बघण्याचा दृष्टिकोनच नकारात्मक आहे. पोलीस म्हणजे हप्तेखोर पोलीस म्हणजे बेकायदेशीर धंद्यांना संरक्षण देणारा खाकीवर्दीतील भ्रष्टाचारी अशी पोलिसांची प्रतिमा तयार करण्यात आली आहे. पण पोलीस हा सुद्धा माणूस आहे. इतरांप्रमाणे त्याचेही कुटुंब आहे. त्या कुटुंबातही अनेक समस्या आहेत आणि समाजाच्या सुरक्षेची अवघड जबाबदारी सांभाळताना त्या बिचाऱ्या पोलिसाला स्वतःच्या कुटुंबातील अवघड समस्यांचा सामना करण्याची जेंव्हा वेळ येते आणि अशावेळी कुटुंबातील लोक सुद्धा त्यांना समजून घेत नाही. तेंव्हा त्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच करवत नाही. पोलिसांच्या कुटुंबातील वातावरण जर चांगले असेल, घरात जर शांतता असेल तरच तो बाहेर चांगल्या प्रकारे आपली सेवा बजावू शकतो. चांगल्या प्रकारे समाजाचे रक्षण करू शकतो. पण त्याच्या घरातच जर समस्या असतील तर तो बाहेर लोकांचे संरक्षण कसे करणार? म्हणूनच पोलिसांच्या कुटुंबातील लोकांनी पोलिसाला घरात जास्त त्रास होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.



कल्याणमध्ये आई आणि मुलीने मिळून पोलीस कॉन्स्टेबलला ठार केल्याच्या घटनेने रक्ताचे नाते कलंकित झाले आहे. मुलीचे एकदा लग्न झाले कि संसार हेच तीच घर असतं. अशावेळी तिला कायमचे माहेरी आणून ठेवल्यास काय घडू शकते याच हे भयंकर उदाहरण आहे...

कल्याणच्या कोळसेवाडीत एका पोलीस कुटुंबात भलतेच घडले. पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश बोरसे यांची विवाहित मुलगी पतीबरोबर नांदायला तयार नव्हती. आणि माहेरी येऊन बसली होती. त्यावरून घरात भांडणे सुरु होती. विवाहित मुलगी जेंव्हा कायमची माहेरी येऊन राहते तेंव्हा तिच्याविषयी लोकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची चर्चा सुरु होते आणि प्रकाश बोरसे यांच्या मुलीच्या बाबतीत सुद्धा असेच घडत होते. त्यामुळे पोलीस असलेल्या प्रकाश बोरसे यांच्या प्रतिष्ठेला कुठेतरी धक्का बसलेला होता. म्हणूनच तिने सासरी जावे असे ते सतत सांगत होते. पण त्यांची पत्नी मुलीच्या बाजूने होती आणि ती मुलीला सासरी पाठवायला तयार नव्हती. यावरून घरात वाद वाढत चालला होता आणि एके दिवशी मायलेकीने प्रकाश बोरसे यांच्या डोक्यात खलबत्ता घालून त्यांची हत्या केली. एका पोलिसांचा त्याच्या पत्नी आणि मुलीने खून केल्याच्या घटनेने संपूर्ण ठाणे जिल्हा हादरून गेला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघी मायलेकींनी अटक केली आहे.

कल्याण पूर्वेतील नाना पावशे चौक कोळसेवाडी परिसरात कौटुंबिक वादातून एका पोलीस कर्मचाऱ्याची त्यांच्या पत्नी व विवाहित मुलीने हत्या केली आहे. यात दोघींनाही पोलिसांनी अटक केली आहे. कौटुंबिक वादातून पत्नी व विवाहित मुलीने पोलीस कर्मचारी असलेल्या कुटूंब प्रमुखाची डोक्यात लोखंडी बत्ताने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कल्याण पूर्वेतील नाना पावशे चौक कोळसेवाडी परिसरात घडली आहे. याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पत्नी व मुलीला पोलिसांनी अटक केली आहे. ज्योती बोरसे (४५) असे अटक केलेल्या पत्नीचे नाव आहे. तर भाग्यश्री पवार (वय २७) असे अटक केलेल्या विवाहित मुलीचे नाव आहे. तर प्रकाश बोरसे (५५) असे मृतक पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ...पान २ वर

## जीवनाची त्यांच्या रहस्यमय शोकांतिका झाली मुलाला मारून बापाने आत्महत्या का केली?

जळगाव (फैजपूर)/क्राईम रिपोर्टर



माणसाच्या मनात नेमके काय दडलेले असते हे कधी कधी त्याच्या रक्ताच्या नात्यातील लोकांनाही कळत नाही. पण जी माणसे सर्वांशी हसत खेळत नॉर्मल जीवन जगात असतात त्यांच्या मनात कुठेना कुठे किसली ना कसली खंत असते. काहींना काही मोठ्या समस्येने त्यांना ग्रासलेले असते. मात्र तसे चेहऱ्यावर ते दाखवत नाहीत आणि कधी तरी असे काही करून बसतात कि संपूर्ण समाज हादरून जातो. जळगाव जिल्ह्याच्या फैजपूर शहरात राहणारे निलेश बखाल यांच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. त्यांचे जीवन नॉर्मल होते. संसार सुखाचा होता. असे असताना एकेदिवशी त्याने आपल्या सहा वर्षांच्या मुलाला ठार मारून स्वतःही आत्महत्या केली. त्यामुळे संपूर्ण शहर हादरले आहे. सुसाईड नोटमध्ये आमच्या आत्महत्येबद्दल कुणालाही जबाबदार धरू नका असे त्यांनी लिहून ठेवले आहे. त्यामुळे या आत्महत्येचे गूढ वाढले असून पोलीस हे गूढ उकलण्याचा प्रयत्न करीत आहेत.



जळगाव जिल्ह्याच्या फैजपूर शहरात एका पित्याने आपल्या सहा वर्षाच्या मुलाची हत्या करुन स्वत: देखील गळफास घेत आत्महत्या केली आहे. शुक्रवार दि. ७ जानेवारी रोजी दुपारी उघडकीस आलेल्या या घटनेने खळबळ माजली आहे. नीलेश घनश्याम बखाल (३३) असे पित्याचे, तर आर्यन बखाल (६) असे मुलाचे नाव आहे. मृत्यूपूर्वी नीलेश बखाल यांनी सुसाइड नोट लिहून आत्महत्येसंदर्भात कुणाला दोष देऊ नका. मी आर्यनला सोबत नेत आहे' असे म्हटले आहे. बखाल हे रावेर तालुक्यातील विवरे येथील मुळ रहिवासी आहेत. नीलेश, त्यांची पत्नी राणी व सहा वर्षाचा आर्यन हे फैजपुर शहरातील आराधना कॉलनीत चार वर्षापासून भाड्याच्या घरात राहण्यास आले होते.

शुक्रवारी सकाळी नीलेश बखाल हे पत्नी व मुलासह शहरात किराणा खरेदीसाठी गेले होते. पत्नी राणी हिला बाजारात सोडून निलेश बखाल हे मुलगा आर्यनला सोबत घेत दुपारी साडे अकरा वाजेच्या सुमारास घरी परतले. नंतर अर्धा तासाने बाजारातील खरेदी आटोपून ...पान २ वर

## बाईचा नाद त्याच्या अंगाशी आला स्त्रीलंपट मजनू अखेर जेलमध्ये गेला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



आरोपी कृष्णा

काही वासनांध लोक अल्पवयीन मुलींना आपल्या नादी लावून त्यांचब मनमुरादपणे उपभोग घेतात आणि नंतर त्यांना सोडून देतात. अशाच एका वासनांधाने दोन मुलींना फसवून तिसरीशी सूत जुळवण्याचा प्रयत्न चालवला होता. पण त्या अगोदरच त्याचे भांडे फुटले आणि तो गजाआड झाला. आता पोलीस त्याच्या पहिल्या पत्नीच्या गूढ मृत्यूची चौकशी करीत आहे. मात्र एवढं सगळं माहित असूनही त्याची दुसरी पत्नी त्याला सोडायला तयार नसल्याने तिचे आई वडील हतबल झाले आहेत.



इन्स्टाग्राम या सोशल मिडीया साईटवर सोळा वर्षाच्या मुलींना प्रेम जाळ्यात ओढून त्यांना पळवून नेण्याचा कृष्णा माधव गोरे या चोवीस वर्षाच्या तरुणाचा उद्योग होता. जळगाव तालुक्यातील कुसुंबा येथे तो रहात होता. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला काही दिवसांपूर्वी उल्हासनगर येथून अटक केली. ज्या अल्पवयीन ...पान २ वर

## साधीभोळी तरुणी शेजाऱ्याच्या प्रेमात फसली लग्नाबाबत विचारताच ती जीव गमावून बसली

मुंबई/एस.कुमार

मुंबई आजकाल प्रेम म्हणजे निव्वळ वासनेचा खेळ बनला आहे. शारीरिक आकर्षणातून एकत्र यायचे आणि मौजमजा झाल्यावर प्रेयसीला सोडून द्यायचे असे प्रकार आजकाल प्रेमात सुरु आहेत आणि काही मुलीही पटकन एखाद्याच्या साखर पेरणीला भुलून पटकन त्याच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकतात आणि कधी अब्रू तर कधी जीव गमावून बसतात. कुर्ल्यात राहणाऱ्या एका फेरीवाल्याची तरुण मुलगी शेजारच्या तरुणाच्या प्रेमात पडली. मात्र त्यांच्या या प्रेमप्रकरणाची सर्वत्र चर्चा सुरु झाल्यानंतर तिने त्याच्या मागे लग्नासाठी तगादा लावला. पण त्याने तिच्याशी लग्न करण्याऐवजी मित्रांच्या सहाय्याने तिचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



मुंबईच्या कुर्ला येथील एचडीआयएल या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बांधलेल्या इमारती गेली १० वर्षे बंद आहेत. त्यामुळे या इमारतीची दुरवस्था झाली आहे. याच इमारतीच्या क्रमांक १६ सी या १३ मजली इमारतीच्या गच्चीवर गुरुवारी दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास काही स्थानिक मुले टिकटाकचा व्हिडीओ बनवण्यासाठी गेली असता मुलांना बंद इमारती वरील लिफ्ट रूममध्ये एका तरुणीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत पडलेला दिसला. त्यामुळे मुले घाबरली. मुलांनी तातडीने या घटनेची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला दिली.पोलीस नियंत्रण कक्षाने कुर्लाच्या विनोबा भावे नगर पोलिसांना फोन केला. तो फोन ठाणे अंमलदार पोलीस उप निरीक्षक किशोरकुमार चव्हाण यांनी उचलला. फोनवरील मॅसेज ऐकून ठाणे अंमलदार चव्हाण यांनी ...पान २ वर

## पैसे न दिल्याने दारुड्याचे डोके फिरले 30 रुपयांसाठी गरिबालाच ठार मारले

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत मामू

दारुड्या माणसाला दारू पिण्यासाठी पैसे नसले कि मग तो एकदम वेडापिसा होतो. अशावेळी त्याने एखाद्याकडे दारूसाठी पैसे मागितले आणि त्याने पैसे दिले नाहीत, नंतर तो भयंकर संतापतो आणि संतापाच्या भरात मग त्याच्या हातून काही घडू शकते. इचलकरंजीत कचरा वेचून पोट भरणाऱ्या एका गरीब माणसाकडे सचिन नावाच्या दारुड्याने दारू पिण्यासाठी तीस रुपये मागितले होते. पण त्यांनी नकार देताच दारूच्या नशेत असलेल्या सचिनने त्याच्या डोक्यात सिमेंटचा दगड घालून त्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सचिनला अटक केली आहे.



आरोपी सचिन

हल्ली लहान मोठया शहरातून फिरस्ते भिकारी हे त्या शहरातील चौका चौकातून पाहयला मिळतात. दिवसभर भिक मागायचे अथवा एखाद्या चहा टपरी किंवा हॉटेलता कपबशा विसळायच्या त्यातून मिळणाऱ्या पैशावर जगायचे असा त्याचा उद्योग चालू असतो. त्यातच काही फिरस्ते हे रस्त्यावरील गटारीतील प्लास्टिकच्या बाटल्या कचरा गोळा ...पान ६ वर

## चार मुलांच्या आईचा व्यभिचार वाढला प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढला

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

चंचल शरीर सुखाला हपापलेल्या बायका आपल्या सुखासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात. अशा बायका आपल्या संसाराचा किंवा मुला-बाळांचाही विचार करीत नाहीत. अनैतिक संबंध टिकवण्यासाठी पतीलाही मार्गातून हटवायला मागे पुढे पाहत नाहीत. भिवंडीत अशाच एका घटनेत चार मुलांची आई चक्क आपल्यापेक्षा सहा वर्षांने छोट्या असलेल्या मुलाच्या प्रेमात पडली. नंतर तिच्या अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीचा तिने प्रियकराच्या मदतीने काटा काढला. दरम्यान या हत्येचा कोणताही पुरावा नव्हता. केवळ मयताच्या शर्टवरील टेलर मार्क वरून पोलिसांनी या हत्याकांडाचा पर्दाफाश केला आणि आरोपीना अटक केली.



प्रेम आंधळा असते प्रेमळ वय नसतं हे सांगितले जाते ते खरे वाटावे असेच काही भिवंडी शहरात घडलेल्या हत्या प्रकरणातून उघडकीस आले आहे .एक चार मुलांच्या आईने आपल्या पेक्षा सहा वर्षाने छोट्या असलेल्या आपल्या प्रियकर सोबतच्या प्रेमात पती अडथळा ठरत असल्याने गावठी औषध घेण्याच्या उद्देशाने आडवाटेच्या जंगलात नेऊन त्याची हत्या करून मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी चेहरा विद्रुप केला परंतु चाणाक्ष पोलिसांनी मृतदेहाचा अंगातील शर्टा वरून मृतदेहाची ओळख पटवीत हत्या करणाऱ्या पत्नी सह प्रियकराच्या मुसक्या अवळल्या आहेत. भिवंडी तालुका पोलीस ठाणे हद्दीत ४ जानेवारी रोजी खारबाव रेल्वे स्टेशन परिसरातील जंगलात एक व्यक्तीचा मृतदेह गळा चिरलेल्या चेहरा विद्रुप केलेल्या अवस्थेत आढळून आल्याने एकाच खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य पाहता मृतदेहाची ओळख पटविण्याचे...पान ६ वर

## व्यावसायिक स्पर्धेचा शेवट भयंकर झाला एका कंत्राटदाराने दुसऱ्याचा खून केला

अंबरनाथ/सुनिल तांबे

प्रत्येक धंद्यामध्ये स्पर्धा असते आणि या स्पर्धेतूनच इर्षा निर्माण होते. एकाच व्यवसायात काम करणाऱ्या दोन व्यक्तींना जेंव्हा आपणच दुसऱ्यापेक्षा पुढे जावे असे वाटू लागते तेंव्हा मग ते दोघे एकमेकांचे पाय ओढण्याचा प्रयत्न करू लागतात. मात्र यातून झालेल्या दुष्मनीतून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. अंबरनाथमध्ये दोन लेबर कॉन्ट्रॅक्टरमध्ये अशीच स्पर्धा सुरु होती आणि त्यातून त्यांच्यात वाद निर्माण झाले. मात्र या वादातून कायमचा मार्ग काढण्यासाठी एका कंत्राटदाराने दुसऱ्याला दारूची पार्टी देऊन त्याचा गेम केला. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.



अंबरनाथ पश्चिम उलन मिल कंपाउंड मध्ये अज्ञान तरुणाचा मृत देह आढळून आला. ही बातमी हवेसारखी अंबरनाथ शहरांत पसरली. ही बातमी पोलीस स्टेशनला कळताच पोलीस घटना स्थळी पोहचले. पंचनाम्याला सुरवात केली. पोलीस्यांच्या प्रथम दर्शी निदर्शनास असे आढळून आले की. अज्ञान न तरुणांच्या डोक्यात दगड टाकून अज्ञान व्यक्तीने खून केल्याचा अंदाज व्यक्त केला. पंचनामा पूर्ण करून खून झालेल्या तरुणाचा मृत देह अंतर्गत तपासणी साठी शासकीय रुग्णालय उल्हासनगर ३ येते पाठवण्यात आला.

पोलिसांची समस्या वाढली पोलिसान समोर मोठा पेच निर्माण झाला. खाकीवर्दीतलं कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची ज्यांच्यावर मोठी जबादारी आहे असे कर्तव्य दक्स ज्यांना आपण पोलीस म्हणतोय. यांनी शोध मोहिमेच चक्र गतिमान करून प्रथमता मृत ...पान ६ वर

10 TO 16 JANUARY 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 08/01/2022 8:55 PM Page 1



## पान १ वरून....

### पैशापुढे आजकाल दोस्ती यारी कुठली...

करणाऱ्या एका महिलेचे दोनशे रुपये एका फेरीवाल्याकडून येणे बाकी होते. या दोनशे रुपयांसाठी तिच्या दारुड्या पतीने त्या फेरीवाल्याच्या मागे तगादा लावला होता. विशेष म्हणजे ते दोघे फेरीवाले त्याचे मित्र होते. एकत्र बसून तिघे दारू प्यायचे. पण दोनशे रुपयांसाठी मित्राने तगादा लावताच दोन्ही फेरीवाल्यांची त्याला त्याच्याच घरात गळा आवळून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही फेरीवाल्यांना अटक केली आहे. योगेश शिंदे हा तरूण तसा गुन्हेगारी प्रवृतीचा होता. तो इचलकरंजी येथे गणेश नगर भागात पत्नी, आई, वडिलासह राहयला होता. सुरूवातीपासून त्याची गुन्हेगारी क्षेत्रातील मित्राशी जोडली गेल्याने तो धाडसी होतो. इचलकरंजीत असताना तो कोणताही काम धंदा करीत नव्हता. कायम दारूच्या नशेत दादागिरी करीत लोकांना धमकावत त्याचेकडून पैसे काढून घ्यायचा.त्याच्या अशा वागणुकीमुळे त्याच्या घरचे लोक ही वैतागलेले होते. त्याची पत्नी संगिता तर त्याला सांगून सांगून दमली होती. तो कोणाचेच काही ऐकत नव्हता. त्यामुळे तो मित्राच्या संगतीने पार बिघडलेला होता. अशातच गेल्या दोन वर्षापूर्वी आरगे मळा परिसरातील ओढयाच्या पलीकडील निर्जन मोकळ्या जागेत हैदर शहानूर कलावंत याचा खून झाला होता. हैदर याच्या खूनातील योगेश शिंदे हा मुख्य संशयीत आरोपी होता. खूनाच्या घटनेनंतर तो पसार झाला होता. इचलकरंजी शहर पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना योगेश शिंदे हा पोलीसांना सापडला. पोलीसांनी त्याचेवर सबळ पुराव्याच्या आधारे कोर्टात चार्ज सिट दाखल करून केस दाखल केली होती.या केस मध्ये योगेश शिंदे याला कोर्टाने दोषी धरून त्याला शिक्षा सुनावली होती. गेल्या एक दीड वर्षापासून तो जेलमध्ये होता. त्यातच त्याला गेल्या चार पाच महिन्यापूर्वी या केसमध्ये जामीन मिळाल्याने तो बाहेर आला.बाहेर आल्यानंतर त्याला पोलीसांनी इचलकरंजीतून हद्दपार केले होते. त्यामुळे तो पत्नीसह मिरजेतील प्रताप कॉलनीत भाडयाने खोली करून राहू लागला. मिरजेत राहत असताना तो आपल्या उदर निर्वाहासाठी मिरज रेल्वे जंक्शनवर तो भेळ,गोळ्या बिस्कीट विकण्याचा धंदा तो करू लागला. यातून त्याचे पोट पाणी चालू होते. त्याला सुरूवातीपासून दारू पिण्याचा नाद असल्याने तो सकाळ संध्याकाळ सारखा दारूच्या नशेत राहयाचा त्याच्या या दारू पिण्याच्या सवयीमुळे त्याची पत्नी संगिता ही वैतागलेली असायची. आपल्या कर्माचे भोग म्हणून ती आपल्या नशिबाला दोष देत त्याचेबरोबर राहत होती. तो गुन्हेगारी वृत्तीचा असल्याने तो सारखा कुणाशी ना कुणाशी भांडत असायचा. दारू साठी कोणाकडे उसणे पैसे मागायचा. त्याला पैसे नाही मिळाले तर तो त्याना बघून घेण्याची भाषा करायचा. मिरजेत आल्यावर सुरवातीला त्याने एका हॉटेलात वेटर म्हणून काम करायला सुरूवात केली. तो राहत असलेल्या प्रताप कॉलनीत त्याचे घराशेजारी सलीम सय्यद आणि प्रकाश पवार हे दोघेजण राहत होते. ते दोघे ही मिरज रेल्वे स्टेशनवर गोळ्या बिस्कीट विकण्याचा धंदा करीत होते त्यातूनच त्याची ओळख ही योगेश बरोबर झाली होती. ते तिघे ही दारू पिण्यासाठी एकत्र बसत होते.त्याच्या संगतीमुळे तर योगेश हा जास्तच दारू पिऊ लागला होता. दारूच्या नशेत तो झिंगत येवून तसाच घरात झोपत होता. एक तर गुन्हेगारी प्रवृती त्यातच दारू पिण्याची सवय त्यामुळे संसराचा गाडा ओढताना त्याची दमछाक होत होती. इचलकरंजीतील त्याचा भाऊ गणेश शिंदे हा ही गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने तो ही सध्या चोरीच्या प्रकरणात जेलमध्येच आहे. त्यामुळे सगळीकडून कुंटूंबाची वाताहात झालेली होती. योगेश याची पत्नी संगिता तर त्याच्या वागणुकीला आणि त्रासाला कंटाळलेली होती. तो कधी पिऊन येतो कधी तसाच नशेत झोपतो याची ती चौकशी ही करीत नव्हती. त्याला काही तरी विचारायला गेली की योगेश हा तिला शिव्या देऊन मारहाण करीत असायचा त्यामुळे तिने त्याला फक्त कुंकूवाचा धनी मानला होता. इकडे सलीम सय्यद आणि प्रकाश पवार याचेबरोबर योगेश हा ही मिरज रेल्वे स्थानकावर गोळ्या बिस्कीट विकू लागला होता.पण त्यातून मिळालेल्या पैशातून तो दारू पित असल्याने त्याचे हातात काहीच उरत नव्हते. त्यामुळे भांडवल नसल्याने काही दिवसातच त्याने तो धंदा ही बंद केला. आता तो कधी हॉटेलात वेटरचे काम करीत असायचा. ते ही काम तो मनात आले तरच करायचा. नाही तर दारू पिऊन तसाच घरात झिंगत झोपायचा. म्हणून पत्नी संगिता ही सलीम सय्यद आणि प्रकाश पवार याचेकडून गोळ्या बिस्कीटचे पॅकीगचे काम घेऊन घरात करू लागली होती. संगिता ही घरात गोळ्या बिस्कीटचे पॅकींगचे काम करीत असल्याने सलीम सय्यद आणि प्रकाश पवार याचे योगेश शिंदे याच्या घराकडे येणे जाणे वाढले होते. त्यातच योगेश हा त्या दोघांना घेऊन घरातच दारूची पार्टी करू लागला होता. दारू प्यायला ते तिघे ही आता योगेशच्या घरीच बसत असल्याने संगिताने ही त्याच्याकडे दुर्लक्ष केले होते. सलीम सय्यद आणि प्रकाश पवार हे दोघे ही वेळच्या वेळी संगिताला पॅकीगचे पैसे देत होते. कधी कधी पैसे मागे पुढे होत होते. गेल्या १५ दिवसातील २०० रूपये प्रकाश पवार हा पॅकीगचे पैसे संगिताला व योगेशला देणे लागत होता. कोरोनाचे संकट वाढल्याने सगळयाच धंद्यावर त्याचा परिणाम झाल्याने त्याचे धंदयावर परिणाम झाला होता. प्रकाश पवारने संगिताला पैसे देण्याचे मान्य केले होते. पण योगेश हा त्या पैशासाठी थांबायला तयार नव्हता. तो सारखा प्रकाशकडे २०० रूपयाचा तगादा लावत होता. दारूच्या नशेत त्याने प्रकाश व सय्यद याना मी एक खून केला आहे. तुम्ही मला २०० रूपये दिले नाही तर मी तुम्हाला दोघांना बघून घेतो, तुमचा ही खून करायला मी मागे पुढे बघणार नाही अशी धमकी दिलेली होती. ते दोघे ही तसे तयारीचे असल्याने त्यांनी योगेशने दिलेल्या धमकीकडे दुर्लक्ष न करता उलट तू काय आम्हाला संपवितोस तू तर पोलीसांना घाबरून इचलकरंजी सोडून मिरजेला राहलयला आला आहेस.आम्ही मिरजेचे आहोत तुलाच संपवितो असे सांगितले होते. तरीही योगेशने त्याच्याशी मैत्री तोडली नव्हती. याला कारण ही तसेच होते. त्या दोघाकडून त्याला पाहिजे त्यावेळी दारू प्यायला मिळत होती. इकडे सलीम सय्यद आणि प्रकाश पवार मात्र त्याला जाणून बजून २०० रूपये दयायला टाळा टाळ करीत होते. तो काय करतो हे त्याना पाहयचे होते. योगेशने पैसे मागितले की ते त्याला मुद्दामच दारूचा एक पेग देऊन गप्प बसवित होते. दारूच्या नशेत तो नेहमी झिंगत घरी येवून झोपला की तो दिवस त्याचा निघून जात होता. सोमवार दि.३ जानेवारी २०२१ रोजी ते तिघे ही रात्री बराच वेळ योगेच्या घरी दारू पित बसले होते. ते बाहेरच्या खोलीत दारू पित असल्याने संगिता ही आतील खोलीत झोपली होती. रात्री बराच वेळ झाले तरी त्याची पार्टी संपली नव्हती. मध्यरात्री एकदा उठून संगिताने उठून पाहिले तर योगेश हा दारूच्या नशेत झोपल्याचे तिला दिसले. नेहमी प्रमाणे त्याला दारूची नशा जास्त झाली असेल आणि तो झोपला असेल म्हणून संगिताने ही त्यावेळी त्याचेकडे कानाडोळा करीत परत आपल्या जागी येवून झोपली.दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी ती नवरा योगेशला उठवायला गेली तरी तो झोपतून उठत नव्हता. त्याचे डोक्यावर व गळयावर व्रण दिसत होते. त्याचा गळा आवळ्याचे दिसत होते. त्यावेळी तिने आरडा ओरडा करायला सुरूवात केली. शेजारचे लोक जमले. कुणी तरी या घटनेची माहिती गांधीनगर पोलीस स्टेशनला दिली. गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यावर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरज शासकीय रुग्णालयात पाठवून दिला.पोलीसांनी या घटनेची माहिती मयत योगेश शिंदे याची पत्नी संगिताकडून घेतली. तिने पोलीसांना सलीम सय्यद व प्रकाश पवार या योगेशच्या दोघा मित्राविषयी माहिती दिली. घटनेच्यां आदल्या रात्री ते तिघे ही आपल्या घरी दारू पित बसले होते. त्यांनीच नवरा योगेश याचा खून केल्याचा संशय व्यक्त केला. तिने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेचा तपास करीत अवघ्या काही तासातच या घटनेतील सलीम सय्यद व प्रकाश पवार या दोघाना ताब्यात घेतले. त्याचेकडे पोलीसांनी चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. प्रकाश पवारकडे योगेश हा राहिलेले पॅकीगचे २००रूपये मागत असताना दारूच्या नशेत त्याचेत वादावादी झाली. त्यात त्या दोघांनी सुरूवातीला योगेश याचा गळा आवळून धरला. त्याचा श्वास गुदमरला गेल्यावर तो जमीनवर पडला. त्यातच त्या दोघांनी त्याच्या डोक्यात लोखंडी सळी घातली त्यात जागीच त्याचा मृत्यू झाल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले. या घटनेची फिर्याद गांधी चौक पोलीसात संगिता योगेश शिंदे हिने दिल्याने तिच्या फिर्यादीवरून पोलीसांनी योगेश हणमंत शिंदे (वय २८) रा.मुळ इचलकरंजी सध्या प्रताप कॉलनी मिरज याच्या खून प्रकरणी सलीम ग्यासुद्दीन सय्यद (वय ३०)व प्रकाश अनिल पवार (वय ३५) रा.दोघे ही मिरज याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मिरज येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली लोखंडी सळी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास गांधी चौक पोलीस करीत आहेत.

### पतीला सोडून आलेल्या मुलीमुळे माहेर ...

मृतक प्रकाश बोरसे कुटुंबासह कोळसेवाडी परिसरातील नाना पावशे चौकातील हिरा पन्ना अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावर पत्नी व विवाहित मुलीसोबत राहत होते. ते कुर्ला येथील पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होते. तीन वर्षापूर्वी आरोपी मुलीचे लग्न योगेश पवार या तरुणाशी लावून दिले. मात्र काही महिन्यात सासरी वाद करून मुलगी पुन्हा माहेरी आली होती. तेव्हापासून ती माहेरीच राहत आहे. त्यामुळे मृतक वडील हे विवाहित मुलाला सासरी जाऊन नांदायला सतत सांगत होते. मात्र यावरून आरोपी पत्नी व मुलगी त्यांच्याशी वाद घालत होती. त्यातच काल रात्रीच्या सुमारास पुन्हा नांदायला जाण्याच्या वादातून कौटुंबीक हिंसाचार होऊन या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. यावेळी मात्र वाद विकोपाला गेला कि, हाणामारीत प्रकाश यांच्या डोक्यात किचनमधील असलेल्या खलबत्ता तिला लोखंडी बत्ता पत्नी ज्योती आणि मुलगी भाग्यश्री या दोघींनी त्यांच्या कपाळावर, तोंडावर प्रहार केला. त्या लोखंडी बत्ताने केलेल्या मारहाणीत प्रकाश बोरसे यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने केलेल्या मारहाणीत प्रकाश बोरसे यांची हत्या केल्याप्रकरणी पत्नी ज्योती व मुलगी भाग्यश्री यांच्या विरोधात कोळसेवाडी पोलीस ठाण्यात भादवि ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाय पोलीस अधिक तपास करत आहेत. तर आज आरोपी पत्नी व मुलगी या दोघीना न्यायालयात हजर केले असता अधिक पोलीस कोठडी सुनावली आहे.

### जीवनाची त्यांच्या रहस्यमय शोकांतिका...

त्यांची पत्नी राणी बखाल घरी परत आली. या वेळी घरातील दरवाजा आतून बंद होता. कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने इतरांच्या मदतीने दरवाजा उघडण्यात आला. समोरचे दृश्य पाहून सर्वांचा थरकाप उडाला. नीलेश व आर्यन हे दोघे नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन मृतावस्थेत आढळले. घर मालक ललित विलास जावळे यांनी फैजपूर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. स.पो.नि. सिद्धेश्वर आखेगावकर, हवालदार देविदास सुरदास, अनिल पाटील, उमेश चौधरी, गुलबक्ष तडवी, महेंद्र महाजन यांनी घटनास्थळ पंचनामा केला. त्यात आत्महत्येसंदर्भात कोणाला दोष देऊ नका. मी आर्यनला सोबत नेत आहे', असे लिहिलेली चिठ्ठी पोलिसांना मिळून आली. मृताच्या पश्चात पत्नी, आई-वडील, विवाहित बहीण असा परिवार आहे. पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी दोघांचे मृतदेह यावल ग्रामीण रुग्णालयात हलवले. तेथे डॉ. शुभम तिडके यांनी दोघांचे शवविच्छेदन केले. दरम्यान नीलेशच्या आत्महत्येचे वृत्त कळताच विवरे येथील उपसरपंच बाबूराव पाटील, ग्रा. पं. सदस्य संदीप पाटील, चंद्रकांत विचवे, अरुण महाजन, भूषण लोखंडे यांनी ग्रामीण रुग्णालय गाठले. घरमालक ललित जावळे (रा. फैजपूर) यांच्या खबरीनुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शवविच्छेदनानंतर विवरे येथे पिता-पुत्रावर अंत्यसंस्कार झाले. घटनेपूर्वी मयत मिलेश बखाल यांनी आपल्या वडिलांना विवरे येथे फोनवर संपर्क साधला होता. बाबा मी डेअरी, चहाची हॉटेल अन् पोल्ट्रीच्या व्यवसायात खूप व्यस्त आहे, वेळच मिळत नाही. आम्ही आनंदी आहोत, तुम्ही चिंता करु नका, पुढच्या आठवड्यात विवऱ्याला येतो, असे नीलेश वडिलांशी फोनवर बोलला होता. त्यानंतर तासाभरातच मुलासह नातवाच्या मृत्यूची बातमी विवऱ्यात धडकल्याने वडील घनश्याम बखाल यांना मोठा धक्का बसला. या घटनेमागचे नेमके कारण समजू शकले नाही. नीलेश बखाल हे घटनेच्या दिवशी सायंकाळी सहकुटुंब शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी जाणार होते, अशी माहिती पुढे आली आहे. मात्र, त्यापूर्वीच त्यांनी जीवनयात्रा संपवल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. गुरुवारपासून ते दूध डेअरीवरही गेले नव्हते. नीलेश बखाल यांनी १८ डिसेंबर रोजी दत्त जयंतीच्या मुहूर्तावर सावदा शहरात भागीदारीतून बापू डेअरी'ला सुरुवात केली होती. स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी नीलेश बखाल चार वर्षापूर्वी फैजपूर येथे आले होते. सुरुवातीला तो एका व्यापाऱ्याकडे लेखपाल म्हणून कामाला होते. मृत नीलेश सोशल मीडियाचा फारसा वापर करत नव्हता. त्याने २१ नोव्हेंबर २०१९ रोजी फेसबुकवर सोच समझकरही नाराज हुवा करो, आज-कल मनाने का रिवाज खत्म हो गया है', २६ ऑगस्ट २०१९ रोजी चार दिवस कुठे लांब जाऊन बघा, लोकं तुम्हाला विसरुन जातील, अशा पोस्ट केल्या होत्या. नीलेश नेहमी आनंदी रहात असे. गावात आल्यावर मित्र-परिवारात मनमोकळेपणाने संवाद साधत असे. त्याने सहा महिन्यापूर्वीच पत्नीसाठी दुचाकी वाहन खरेदी केले होते. नीलेश हा सर्वांची कामे करायचा, जेणे करुन कुणाचेही मन दुखावू नये. सर्वांची खूप काळजी घ्यायचा, मात्र आत्महत्या करुन आई-वडिलांना का दुखावले? असा आक्रोश नीलेशची आई मंगलाबाई यांनी केला.

### बाईचा नाद त्याच्या अंगाशी आला...

मुलीला त्याने पळवून नेले ती सहा महिन्यांची गर्भवती आहे. आपल्यासोबत फसवणूक करुन दुसरीसोबत कृष्णाने संसार थाटल्याचे समजल्यानंतर पहिल्या मुलीचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. कृष्णा माधव गोरे हा कोणताही कामधंदा करत नाही. केवळअल्पवयीन मुलींना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचा उपभोग घेणे हाच त्याचा उद्योग आहे. कृष्णा याने इन्स्टाग्राम या सोशल साईटच्या माध्यमातून भुसावळ तालुक्यातील एका सोळा वर्ष वयाच्या मुलीसोबत संपर्क साधला. त्याने तिच्यासोबत ओळख वाढवली. तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यात तो यशस्वी झाला. त्यामुळे त्याचे धाडस वाढले. ११ जून २०२१ रोजी त्याने तिला पळवून नेले व तिचा उपभोग घेतला. आधीच पतीचे निधन व त्यात मुलगी गायब झाल्याची घटना घडल्याने त्या मुलीची विधवा आई गांगरुन गेली. सहा महिन्यांपासून ती माता पोलीस स्टेशन व नातेवाईकांच्या दारात तपासासाठी चकरा मारत होती. मात्र तिची फिरस्ती व्यर्थ गेली. अखेर तीने पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंडे यांची भेट घेत आपली व्यथा कथन केली. आपल्या मुलीच्या शोधासाठी तिने पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंडे यांना विनंती केली. सर्व प्रकरण समजून घेतल्यानंतर त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.,नि. किरणकुमार बकाले यांना हे प्रकरण सोपवून तपासाचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक किरणकुमार बकाले यांनी कृष्णाची सर्व कुंडली बाहेर काढली. त्याचा जवळचा मित्र अनुप मांडवे (सुप्रीम कॉलनी जळगाव) याला गोड बोलून आपल्या कार्यालयात बोलावून घेतले. चोकशीत त्याने आपल्याला काहीच माहिती नाही असा सुरुवातीला सावध पवित्रा घेतला. मात्र तोच कृष्णाच्या संपर्कात राहून त्याला माहिती देत असल्याची पो.नि. बकाले यांची खात्री झाली. त्यांनी त्याला खाकीचा हिसका दाखवला. अखेर त्याने माहिती देण्यास सुरुवात केली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलीस उप निरीक्षक अमोल देवढे, रणजीत जाधव, किशोर राठोड, विनोद पाटील, श्रीकृष्ण देशमुख, योगिता पाचपांडे व मुरलीधर बारी यांचे पथक उल्हासनगर येथे रवाना केले. भल्या पहाटे दोघांना पथकाने ताब्यात घेत जळगावला आणले. कृष्णा याने २० मे २०१९ रोजी जळगाव शहरातून सोळा वर्षाच्या एका मुलीला आपल्या प्रेम जाळ्यात ओढून पळवून नेले होते. दोन वर्ष तो तिच्या सोबत बाहेर फिरला. तिचे वय अठरा वर्ष झाल्यानंतर त्याने तिच्यासोबत आळंदी येथे लग्न केले. त्यानंतर तो तिला घेऊन कुसुंबा येथे राहू लागला. याप्रकरणी जळगाव जिल्हापेठ पोलीस स्टेशनला त्याच्याविरुद्ध भा.द.वि. ३६३ व ३७६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. आपल्यासोबत लग्न केले. मात्र दुसऱ्या मुलीसोबत पसार झाल्याचे समजल्यांतर पहिल्या मुलीची अवस्था खराब झाली होती. दिवाळीच्या कालावधीत तिचे संशयास्पद निधन झाले. तिच्या वडिलांनी घातपाताचा संशय व्यक्त केला. दुसऱ्या गर्भवती अल्पवयीन मुलीसह त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे समजल्यानंतर पहिल्या मुलीच्या वडिलांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेत आपबिती कथन केली. गर्भवती मुलीसह ताब्यात घेतलेल्या कृष्णाची अजून तिसऱ्या मुलीला आपल्या प्रेम जाळ्यात ओढून पळवून नेण्याची तयारी होती. पोलिसांनी उल्हासनगर येथून गर्भवती पिडीत मुलीला कृष्णासोबत जळगाव येथे आणल्यानंतर तिला तिच्या आईच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तिने कृष्णासोबत राहण्याचा अट्टाहास केला. कृष्णा जेलमध्ये जाणार असेल तर मी देखील जेलमध्ये त्याच्यासोबत जाणार असल्याचे तिने म्हटले. कृष्णामुळे अगोदरच एका मुलीचा जीव गेला असून तू अजून अल्पवयीन असल्याचे तिला सर्वांनी समजावून सांगितले. मात्र या वयातील शारीरिक आकर्षण तिला स्वस्थ बसू देत नसल्याचे एकंदरीत दिसून आले. अल्पवयीन मुलींना आपल्या प्रेम जाळ्यात अडकवून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा कृष्णाचा उद्योग आहे. अल्पवयीन मुली सज्ञान झाल्यानंतर त्यांच्यासोबत लग्न करुन पुन्हा त्यांना त्यांच्या घरी सोडून देणे व मानसिक त्रास देण्याचा प्रकार तो करत असल्याचे एकंदरीत दिसून आले. पुढील तपासकामी त्याला भुसावळ तालुका पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

### साधीभोळी तरुणी शेजाऱ्याच्या प्रेमात...

तातडीने ही माहिती आपल्या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश पवार यांना दिली. ते आपलं सहकारी पोलीस निरीक्षक अजय क्षीरसागर, पंकज धाडगे, महीला पो. नि .पाटील, सपोनि पद्माकर पाटील, धुतराज, पोउनि. सपकाळे, पाटील इत्यादी घटनास्थळी रवाना झाले. त्याच बरोबर परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त प्रणय अशोक व सहाय्यक पोलीस आयुक्त सुरेश जाधव यांनीही घटनास्थळी भेट दिली. घटनास्थळी पोचताच पोलिसांना ए. डी. आय. एल. बिल्डींग, सी विंग चे १३ मजल्यावरील टेरेसवरचे लिपट रूममध्ये एक १८ वर्षाची तरुणी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली . तिची कोणी तरी अज्ञात आरोपीने गळा चिरुन तसेच शरिरावर अनेक ठिकाणी भोसकून निर्घृणपणे हत्या केली होती. पोलिसांनी मृत तरुणीचा व घटनास्थळचा पंचनामा करून, तो मृतदेह विच्छेदनासाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात पाठविला. शवविच्छेदन अहवालात या तरुणीवर बलात्कार झाल्याचे नमूद करण्यात आले होते . बलात्कार करून या तरुणीची हत्या करण्यात आल्याने विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गु.र.क्र . ३७६/२०२१ कलम ३०२, ३७६ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला. एका तरूणी वर बलात्कार करून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याने कुर्ला (पश्चिम) परिसरात खळबळ उडाली होती. त्यामुळे या घटनेतील मृत तरुणीची ओळख पटवून आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याचे पोलिसांसमोर मोठे आवाहन होते. त्यासाठी पोलीस उप आयुक्त प्रणय अशोक व स.पो. आयुक्त सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा उघडकीस आणन्याकरीता विनोबा भावे नगर, कुर्ला, धारावी या पोलीस ठाणेची आठ पथके स्थापन करण्यात आली. तसेच त्यांच्याकडे वेगवेगळी जबाबदारी सोपविण्यात आली. ही तपास पथके दिवसरात्र आरोपीचा शोधार्थ फिरत होती. परिमंडळ ५ मध्ये कोणी महिला बेपत्ता आहे का? याचा शोध घेत पोलीस पथक फिरत होते. त्यावेळी देवनार पोलीस ठाण्यात एक १८ वर्षाची तरुणी बेपत्ता असल्याची माहिती प्राप्त झाली . पोलिसांनी देवनार पोलीस ठाणे गाठून माहिती घेतली असता, दि. २४ नोव्हेंबर रोजी नाजमीन हारून शेख ही १८ वर्षाची तरुणी गोवंडीच्या टाटानगर मधून बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटूंबियांनी दिल्याची माहिती मिळाली. या बाबत देवनार पोलीस ठाण्यात मिसिंग क्रमांक, १०८/२०२१ प्रमाणे नोंद असल्याचे आढळून आले. मिसींग तरुणी आणि या गुन्हयातील मृत तरुणीचे वर्णन मिळतेजुळते वाटत असल्याने तपास पथकाने या मुलीच्या आईवडिलांना गाठले .त्यांना गुन्ह्याची थोडक्यात माहिती देऊन घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात घेऊन गेले. तेथील शवागृहात ठेवलेले ते प्रेत त्यांना दाखविले असता, त्यांनी एकच टाहो फोडला. साहेब ही आमची मुलगी नाजमीन असल्याचे सांगितले. तपास पथकाने सर्व सोपस्कार पूर्ण करून ते प्रेत पुढील अंत्यविधीसाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. आता मृतक तरुणीची ओळख पटली होती .पण तिचा खून करून पसार झालेला आरोपी पोलिसांच्या हाती लागलेला नव्हता. नाजमीन हारून शेख हिचा खून कोणी, का आणि कशासाठी केला ? याचे गूढ अद्यापही कायम होते. पोलीस पथक आरोपीचा शोध घेत फिरत होते .त्यासाठी त्यांनी तिचे आईवडील, मैत्रिणी यांचेकडे चौकशी केली , तसेच ती वापरत असलेल्या मोबाईल फोनचे सी.डी.आर./एस.डी. आर. काढण्यात आले. यावेळी नजमीनच्या सानिध्यात रेयान खान नावाचा तरुण असल्याचे आढळून आले. पोलिसांनी रेयान या तरुणांबाबत माहिती प्राप्त करून कुर्ल्यातून त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी केली परंतु तो काही दाद देत नव्हता. उलटसुलट उत्तरे देऊन पोलिसांची दिशाभूल करत होता. शेवटी पोलिसांनी त्याला आपला हिसका दाखविला असता तो सुतासारखा सरळ झाला. शेवटी त्याने आपला मित्र फैसल शेख व माज अक्रम शेख (वय १९) याच्या मदतीने नजमीन शेख या तरुणीचा खून केल्याची धक्कादायक कबुली दिली. पोलिसांनी फैसल शेख (वय १९) माज अक्रम शेख या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले .पोलीस ठाण्यात आणून तिघांची समोरासमोर चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. गोवंडीच्या टाटानगर मध्ये हारून शेख हे आपल्या परिवारासह राहतात. फेरीवाल्याचा व्यवसाय करून दिवसरात्र काबाडकष्ट करून आपली पत्नी, दोन मुलगे आणि एकुलती एक मुलगी नाजमीन यांचा चरितार्थ चालवितात. नाजमीन ही दहावी शिकलेली असून ती आईला घरकामात मदत करीत असे. आईचा नाजमीन वर फारच जीव होता .त्यामुळे ती देखील आईची काळजी घेत असे. नाजमीनच्या शेजारीच रेयान खान नावाचा १९ वर्षाचा तरुण राहत होता . दोघेही शेजारी राहत असल्याने रोज त्यांच्यात बोलणे व्हायचं. यातून नाजमीन आणि रेयान मैत्रीच्या बंधनाला तोडून प्रेमाच्या रेशमी कोशात अडकले. मैत्री, सहवास, हुरहूर, विरह या भावनांच्या आंदोलनातून ते केव्हा प्रेमाच्या मायावी हिंदोळ्यावर बसून झोके घेऊ लागले. हे त्यांना कळलेच नाही. पुढे ते आई-वडिलांच्या पाश्चत लपूनछपून भेटू लागले. काही दिवसातच त्या दोघांच्या प्रेम संबंधाची चर्चा सुरू झाली. तेव्हा नजमीनने रेयान खान समोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. मात्र तो त्याने फेटाळून लावला. नाजमीन बरोबर प्रेमाचे रंग उधळले तरी तीच्याशी लग्न करण्याची त्याची अजिबात इच्छा नव्हती. परंतु त्या दोघांच्या प्रेमप्रकरणाची इतकी चर्चा झाली होती की, झालेली बदनामी टाळण्यासाठी त्यांचे लग्न लावणे हे आवश्यक झाले होते. त्यासाठी नाजमीन रेयानवर लग्नासाठी दबाब आणत होती. मात्र त्याला तिच्याशी लग्न करायचं नव्हते. याचा काहीतरी बंदोबस्त करायला पाहिजे, अशा प्रकारचे विचार रेयानच्या मनात येऊ लागले .त्याने यासंदर्भात त्याचा मित्र फैझल शेख व माज अक्रम शेख सोबत विचारविनिमय केला. आपल्या वर आलेले संकट दूर करण्यासाठी काय करायला पाहिजे यासंबंधी बराच विचार करून शेवटी तिघांनी एक निर्णय घेतला .नाजमीनला कायमचे संपवायचं. त्यानुसार तिघांनी पध्दशीपणे बेत आखून कोणालाही सुगावा लागणार नाही अशा पध्दतीने कट रचला. त्यानुसार दि.२३ नोव्हेंबर रोजी रेयानने अगदी गोडीगुलाबीने, विश्वासात घेऊन नजमीन हिला फोन केला. तुझ्याशी लग्नसबंधी बोलायचे आहे असे सांगून तू सायंकाळी कुर्ला येथील ए.डी.आय.एल. बिल्डींग, सी विंग चे १३ मजल्यावरील टेरेसवर या निर्जनस्थळी ये, आपण दोघे सविस्तर बोलू असे सांगितले. संधीभोळी नाजमीन रेयानच्या बोलण्याला फसली. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तिने भेटण्यास होकार दर्शविला. त्यानुसार २३ नोव्हेंबर रोजी ती आईवडिलांना नमाज पढायला जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. रेयांन त्याचे मित्र फैझल आणि माज शेख असे तिघेही ठरलेल्या प्लॅननुसार तिची वाट पाहत होते. सायंकाळी नजमीन रेयानने बोलावलेल्या ठिकाणी पोहचली. दोघांत बऱ्याच वेळापर्यंत गप्पांगोष्टी झाल्या. त्यानंतर लग्नाचा विषय निघाल्यावर त्या दोघात वाद झाला. यावेळी थोडा अंधार पसरला होता. जवळपास कोणाचीच चाहूल जाणवत नव्हती. त्याचवेळी रेयानचा संताप उफाळून आला. त्यांची विखारी नजर तिच्या शरीरावर पडली. त्याने तिच्यावर बलात्कार करून तिचा धारदार चाकूने गळा चिरला. जीव वाचविण्यासाठी तिची धडपळ सुरू असताना फैसलने तिला गच्च पकडून ठेवले. त्यामुळे तिचे परतीचे दोर कापल्या गेले. चाकूने गळा चिरल्याने ती रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळली. तेव्हा फैसलने हातोड्याने तिच्या डोक्यावर आणि शरीरावर घाव घातले. माजनेही याकामी त्याला मदत केली. रक्तबंबाळ झालेली नाजमीन काही क्षणातच अल्लाला प्यारी झाली. नजमीची इतक्या क्रूरपणे हत्या केल्यावर या तिघांनी घटनास्थळवरून पळ काढला. त्यानंतर रेयान कुर्ला येथील भारती नगर मध्ये राहणाऱ्या फैसलच्या घरी लपून बसला. तर माज शेख आपल्या कुर्ल्यातील घरी निघून गेला. इकडे नमाज पाढायला गेलेली मुलगी घरी न आल्याने नाजमीनचे आईवडील व भाऊ, तिचा सर्वत्र शोध घेत फिरू लागले. परंतु तिचा कुठेही थांगपत्ता लागला नाही. अखेर त्यांनी देवनार पोलीस ठाणे गाठून मिसिंगची तक्रात दिली. बेपत्ता झालेल्या नाजमीनचा देवनार पोलीस शोध घेत असताना तिच्याच वर्णनाशी मिळताजुळता एका १८ वर्षीय तरुणीचा मृतदेह कुर्ला येथील ए.डी.आय.एल.बिल्डींग, सी विंगचे १३ मजल्यावरील टेरेसवरचे लिपट रूममध्ये आढळून आला. यावेळी घटनास्थळी आरोपींनी कुठलाही पुरावा मागे सोडलेला नव्हता. तरी विनोबा भावे नगर पोलिसांनी आरोपीचा माग काढून नाजमीनचा प्रियकर रेयान खान, त्याचे मित्र फैसल शेख व माज अक्रम शेख या तिघांना मोठया शिताफीने दि.२७ नोव्हेंबर रोजी अटक केली. परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त प्रणय अशोक, सहाय्यक पोलीस आयुक्त सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विनोबा भावे नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश पवार, पोलीस निरीक्षक अजय क्षीरसागर, पंकज धाडगे, महिला पोलीस निरीक्षक पाटील, सपोनि पद्माकर पाटील, धुतराज, पोउनि. सपकाळे, महिला पोउनि. पाटील, सायबर कक्षाचे पो.ना. पवार, ए.टि.सी. कक्षातील ए.एस.आय. इब्राहिम सय्यद आणि पथक, गुन्हे प्रकटीकरण पथक, तडीपार पथक, मिसींग पथक तसेच कुर्ला व धारावी पोलीस ठाणेचे अधिकारी आणि अंमलदार यांनी हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कठोर मेहनत घेतली.

10 TO 16 JANUARY 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 08/01/2022 8:55 PM Page 1



# भिवंडीतील चिंबीपाडा आश्रमशाळेत ३० जणांना कोरोना लागण

## पालकांनी गोंधळ घालत बाधित मुलांना घेऊन काढला पळ



**भिवंडी/आकाश गायकवाड**

देश तिसऱ्या लाटेच्या उंबरठ्यावर असतानाच ओमायक्रॉन या नव्या विषाणूने हाहाकार माजविण्यास सुरवात केली असून भिवंडी तालुक्यातील चिंबीपाडा येथील शासकीय आश्रमशाळेतील वस्तीगृहात राहणाऱ्या काही विद्यार्थ्यांना सर्दी खोकला जाणवू लागल्याने मुख्यध्यापक आर एन चौधरी यांनी नजीकच्या चिंबीपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात विद्यार्थ्यांची तपासणी केली असता १४ मुली ४ मुलांसह अधीक्षक व स्वयंपाकी अशा एकूण २० जणांना कोरोनाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खबरदारी म्हणून आश्रमशाळा वस्तीगृह व शाळेतील विद्यार्थ्यांची अँटीजेन चाचणी घेण्यास सुरवात केली असता ही बातमी वाऱ्याच्या वेगाने परिसरात पसरली त्यानंतर आश्रमशाळेत पालकांनी एकत्रित होऊन गोंधळ घालीत चाचणी करण्यास व बाधित विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्यास मज्जाव करण्यास सुरुवात केली. या आश्रमशाळेत एकूण ६०२ विद्यार्थ्यांपैकी ४७६ विद्यार्थी हजर होते.त्यापैकी १८७ विद्यार्थी वस्तीगृहात १४० विद्यार्थी हजर होते. व्यवस्थापनाने १७५ जणांची तपासणी केली असता त्यामध्ये २२ मुली, ६ मुले व २ कर्मचारी असे एकूण ३० जण लागण झालेले आढळून आले. मात्र पालकांनी गोंधळ घालीत लागण झालेल्या विद्यार्थ्यासह चाचणी झालेले, न झालेले अशा सर्वच विद्यार्थ्यांना घेऊन पालक घराकडे पसार झाले. या घटने नंतर आरोग्य यंत्रणा, आदिवासी प्रकल्प विभाग, पोलिस व महसूल प्रशासन या घरी निघून गेलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेत असून त्यांना शोधून आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून गृह विलगिकरण अथवा रुग्णालयात दाखल करण्या बाबत निर्णय घेणार असल्याची माहिती आश्रमशाळेचे मुख्याध्यापक आर एन चौधरी यांनी दिली आहे. दि.०३ जानेवारी रोजी ही घटना दुपारी १२ वाजता उघडकीस आली मात्र तालुका आरोग्य विभाग, पंचायत समिती प्रशासनाला सायंकाळ पर्यंत या घटनेची माहितीच नसल्याने फक्त रुग्णवाहिका आणून ठेवल्याने आदिवासी पालक भयभीत होत त्यांनी आपल्या मुलांना घेऊन पळ काढला त्यामुळे या सर्वच यंत्रणांची डोकेदुखी वाढली आहे एवढे नक्की.

## थकित मालमत्ता करापोटी तीन दुकाने सील; लातूर मनपाची धडक कारवाई




**लातूर/प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून थकलेला मालमत्ता कर न भरल्यामुळे मनपाने औसा रोडवरील तीन दुकानांना शुक्रवारी (दि.७ जानेवारी) सील ठोकले. औसा रस्त्यावर श्रीमती गीतांजली भास्कर मोरे यांच्याकडे मालमत्ता कराची ७ लाख १२ हजार ४७२ रुपये थकबाकी होती. यासंदर्भात संबंधितांना नोटिसा देऊनही थकबाकी भरणा केला जात नसल्याने मनपा आयुक्तांनी संबंधित मालमत्ता सील करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार श्रीमती मोरे यांच्या मालमत्तेतील तीन दुकानांना सील ठोकण्यात आले. नोडल ऑफिसर समद शेख, बी झोन पथक प्रमुख नंदकिशोर तापडे यांच्या सुचनेवरून क्षेत्रीय अधिकारी किशोर पवार, सहाय्यक कर निरीक्षक प्रकाश खेकडे, वसुली लिपीक सुनिल शिंदे, विक्की खंदारे, सिद्धाजी मोरे, संतोष पिसके, निसार शेख व परमेश्वर झेंडे यांनी या कारवाईत सहभाग घेतल.

## वखार महामंडळाच्या गोदामात शेतमालाची साठवणूक करुन अत्याधुनिक सोई, सुविधा व सवलतीचा लाभ घ्यावा

**लातूर/प्रतिनिधी**

महामंडळाच गोदामात साठवणूकीसाठी ठेवण्यात येणाऱ्या शेतमालाच्या वखार पावतीवर ऑनलाईन तात्काळ कर्ज उपलब्ध होत असल्याने संबंधित शेतकरी, ठेविदार यांची वेळेची बचत होऊन कागदपत्रासाठीचा प्रवास खर्चात बचत होण्यास मदत होते. शेतकरी तसेच शेतकरी उत्पादक कंपनी यांनी या सुविधांचा लाभ सुगीच्या काळात व्यापाऱ्यांना माल न विकता तो वखार महामंडळाच्या गोदामात ठेवून सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन लातूर विभाग प्रमुख के.आर. पवार यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हा महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असून राज्यभरात गोदामाचे जाळे निर्माण करुन औद्योगिक व कृषि क्षेत्रास अन्नधान्याची नासाडी होऊ नये म्हणून साठवणूकीची सुविधा पुरविण्यासाठी वखार महामंडळाची निर्मिती करण्यात आलेली आहे. महामंडळाव्दारे शेततीमाल तसेच शेतीसाठी लागणारे बी-बियाणे, किटकनाशके यांची शास्त्रोक्त पध्दतीने सुरक्षित साठवणूक करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. महामंडळाची मुंबई, लातूर, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, अमरावती व औरंगाबाद ही ८ विभाग आहेत. राज्यातील महामंडळाची एकूण २०५ वखार केंद्रावर १२६२ गोदामाची एकूकण साठवणूक क्षमता २१.१५ लाख मे.टन इतकी आहे. महामंडळाच्या लातूर विभागात लातूर, हिंगोली, उस्मानाबाद, परभणी व नांदेड जिल्हा असून याअंतर्गत एकूण ३३ वखार केंद्र व १४७ गोदामे असून साठवणूक क्षमता ३ लाख ७६ हजार मे. टन इतकी आहे.शेतमाल उत्पादन बरोबरच शेतमालची सुरक्षित साठवणूक व त्याची विक्री व्यवस्थापन देखील महत्वाचे आहे. सुगी हंगामाच्या वेळी बाजारपेठेत शेतमालाची आवक जास्त होत असल्याने शेतकऱ्यांना कमी दरात शेतमालाची विक्री करावी लागते. अशा वेळेस कृषिमालाच्या प्राधान्य देऊन महामंडळ राज्यातील सर्व ठिकाणच्या गोदामामध्ये या हंगामात नियोजन करीत आहे. महामंडळाच्या सर्व गोदामाचे शास्त्रोक्त पध्दतीने शेती औद्योगिक मालाची साठवण केली जाते. ठेविदाराना दिलेली महामंडळाची वखार पावती परक्राम्य लेख (Negotiable Insrument) असल्याने ती बँकेकडे तारण ठेवल्यास, ठेविदाराना बँकेकडून त्वरित कर्ज उपलब्ध होते. त्या आधारे शेतकऱ्यांना हंगामात अर्थ सहाय्य व नंतर बाजारभाव येईपर्यंत गोदामात साठवणूकीची सोय मिळते. शेतकऱ्यांनी चालू पिकाचा ७/१२ उतारा दिल्यानंतर वखार भाडयात प्रचलित साठवण दराच्या ५० टक्के सवलत देऊन २५ टक्के जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. या शिवाय प्रत्येक पंधरावाडयामध्ये किड प्रतिबंधात्मक व दर तीन महिन्यानी उपचारत्मक किटकनाशकांचा वापर करुन माल सुरक्षित ठेवण्यात येतो. साठवणुकीस असलेल्या सर्व मालाचा १०० टक्के विमा संरक्षण दिल्या जाते, त्यामुळे नुकसान झाल्यास योग्य ती भरपाई दिल्या जाते.याशिवाय वखार महामंडळ व महाराष्ट्र सहकारी बँक यांचे संयुक्त विद्यमाने शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपनी यांचे करिता अभिनव ऑनलाईन तारण कर्ज योजना ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचावापर करुन राबविणयत येत आहे. याअंतर्गत पात्र शेतकरी किंवा शेतकरी उत्पादक कंपनी यांना वखार पावतीवरील शेतमालाच्या किंमतीच्या ७० टक्के कर्ज बँकेकडून संबंधितांच्या खात्यात आरटीजीएस अथवा एनईएफटीव्दारे जमा करण्यात येते या तारण कर्जाचा व्याजदर ९ टक्के असून इतर बँकेच्या तुलनेत सर्वात कमी आहे. तारण कर्जाची मर्यादा १० लाख प्रती शेतकरी व ७५ लाख प्रती शेतकरी उत्पादक कंपनी इतकी आहे.

## मानवाधिकारी सहाय्यता संघाच्या जिल्हा महिला प्रमुखपदी सुवर्णा महाजन



**अहमदपुर/फिरोज शेख**

सामाजिक कार्यात पुढाकार घेवून उत्कृष्ठपणे सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या सुवर्णा बसवंत महाजन यांची मानवाधिकार सहायता संघाच्या महिला लातूर जिल्हा प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. सदरील निवड ही मानवाधिकारी सहाय्यता संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सोनू सिंह यांच्या आदेशावरुन करण्यात आली असुन नियुक्ति पत्रावर राष्ट्रीय सचिव रवि धारणें, राष्ट्रीय मंत्री कल्पेश व्यास यांच्या सह्या आहेत. सदरील निवड ही मानवाधिकाराच्या रक्षणासाठी तसेच समाजातील वाईटाविरोधात कार्य करणे तसेच संघटन वाढविण्यासाठी करण्यात आली आहे. सदरील नियुक्ति पत्राच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर, वरिष्ठ पोलिस अधिक्षक लातूर तसेच पोलिस स्टेशन अहमदपूर यांना देण्यात आल्या आहेत. सदरील निवडी बद्दल कृ.उ.बा.स. अहमदपूर सभापती शिवानंद तात्या हेंगणे, नगराध्यक्षा सौ. अश्विनीताई कासनाळे, नगरसेवक दिपक शिंगडे, अॅड सुहास चाटे, ईनरव्हिल क्लबच्या अध्यक्षा डॉ. वर्षा भोसले, लायनेस क्लबच्या अध्यक्षा नलिनी बेंबडे, अॅड. रोहिनी देशमुख, अॅड. अर्चना डख, अॅड. मधु कराड, जिल्हा अध्यक्ष शहर-प्रा.डॉ. महेश मोरे, जिल्हा अध्यक्ष ग्रामीण-बासिदखान पठाण, जिल्हा प्रमुख प्रा. शादुल पठाण, ता.अध्यक्ष इमरोज पटवेगर, प्रा. मारोती बुद्रुक पाटील, प्रा.डॉ. बालाजी कारामुंगीकर आदींसह मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.

## राष्ट्रीय मराठा पार्टी शिक्षक सेल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी प्रंशात विलासराव चांदोरे यांची नियुक्ती



**देवणी/प्रतिनिधी**

राष्ट्रीय मराठा पार्टी शिक्षक सेल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी प्रंशात विलासराव चांदोरे यांची नियुक्ती राष्ट्रीय मराठा पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अंकुशराव पाटील होनाळीकर यांनी केली. हि निवड तीन वर्षासाठी केली आहे. प्रंशात चांदोरे यांनी महाराष्ट्र राज्यात शिक्षकांचे संघटन करून येणाऱ्या शिक्षक मतदारसंघात निवडणूक लढवुन शिक्षक बांधवाचे प्रश्न मार्गी लावयाचे आहेत सर्व शिक्षक बांधवांना १००% अनुदान मिळवून न्याय दयावयाचे आहे. म्हणून विधानसभेवर भगवा झेंडा फडकावयाचा असल्याचे मत चांदोरे यांनी क्राईम संध्याशी बोलताना व्यक्त केले. या निवडीबद्दल उस्मानाबाद जिल्हा अध्यक्ष दिपक तपशाळे, बिड जिल्हा अध्यक्ष नागनाथराव जाधव, औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष भरत कदम, नांदेड जिल्हा अध्यक्ष विजय पाटील, परभणी जिल्हा अध्यक्ष सुधाकर शिंदे, पुणे जिल्हा शहर जिल्हा अध्यक्ष रवींद्र वेदपाठक, पुणे जिल्हा शहर संपर्क प्रमुख नेताजीराव भोसले, नवी मुंबई अध्यक्ष रमेश शिंदे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष सुयश शिरके, पुणे जिल्हा उपाध्यक्ष सचिन भोसले, सचिव विकास बिरादार, लातूर जिल्हा उपाध्यक्ष राघवेंद्र जाधव, दत्ता धुडूकनाळे, उदगीर विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष रामभाऊ बिरादार, देवणी तालुका अध्यक्ष अनिलराव पाटील अदिनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले.

## ठाणे येथे १६६ निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान




**ठाणे/प्रतिनिधी**

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने संत निरंकारी सत्संग भवन, गणेशवाडी, ठाणे येथे नववर्षाच्या पहिल्याच रविवारी, दि.२ जानेवारी, २०२२ रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये १६६ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान करुन नववर्षाचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली रक्तटंचाई दूर करण्याच्या हेतुने संत निरंकारी मिशनच्या वतीने मुंबई महानगर प्रदेशात जवळ जवळ प्रत्येक आठवड्याला रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. निरंकारी भक्तांमध्ये मानव सेवेसाठी उत्साहाने पुढे येण्याची ही भावना त्यांच्या सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन शिकवणूकीमध्ये निहित आहे ज्यांच्या कथनानुसार जीवन तेव्हाच महत्वपूर्ण ठरते जेव्हा ते इतरांसाठी जगले जाते. रक्तदान शिविराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाचे चेंबूर येथील सेक्टर संयोजक बाबूभाई पांचाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाचे स्थानिक प्रबंधक आणि सेवादल अधिकारी उपस्थित होते. संत निरंकारी मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक डॉ.आर.एस.यादव यांनी स्थानिक सेवादल युनिट आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांच्या सहकार्याने या शिबिराची सुंदर प्रबंध व्यवस्था तयार केली होती.

## वृद्धाची दिड लाखांची फसवणूक

ठाणे : क्रेडिट कार्डची मुदत संपली आहे, असे खोटे सांगणाऱ्या व्यक्तीशी फोनवर बोलत असतानाच सायबर गुन्हेगारांनी ज्येष्ठ नागरिकाच्या क्रेडिट कार्डद्वारे १ लाख ७९ हजार ५५८ रुपये काढल्याचा प्रकार ठाण्यात समोर आला आहे. या फसवणुकीप्रकरणी नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या ज्येष्ठ नागरिकाचे वय ७३ वर्ष असून ते नौपाडा परिसरात राहतात. त्यांची कंपनी असून त्यांच्याकडे एका खासगी बँकेचे क्रेडिट कार्ड आहे. ३ जानेवारी रोजी त्यांना फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने आपण एका बँकेच्या क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या कार्डची मुदत संपली असून तुम्हाला पुन्हा कार्ड चालू करायचे असल्यास आधार नंबरसह इतर माहिती ऑनलाइन भरावी लागेल असे सांगण्यात आले. परंतु ज्येष्ठ नागरिकाने मी बँकेत जाऊन स्वतः माहिती देईन, असे त्या व्यक्तीला सांगितले. नंतर ज्येष्ठ नागरिकाला पाच वेळा फोन आले. मात्र त्यांनी फोन घेतले नाहीत. पुन्हा फोन आल्यानंतर त्यांनी फोन घेतला. त्यावेळी समोरून जे फोन आले होते, ते 'केवायसी'साठी बँकेतून आले असल्याचे सांगितले. त्या व्यक्तीबरोबर फोनवर बोलत असतानाच ज्येष्ठ नागरिकाच्या क्रेडिट कार्डवरून परस्पर पैसे काढले गेले.

## मुंबईतील पोलिसाने भिवंडीतील कॅमेरामनला विसरलेला महागडा आयफोन केला परत!



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील नवीचाळ येथील रहिवाशी तसेच कॅमेरामन राहुल राजेंद्र घैसास हे काही कामानिमीत्त कोल्हपुरला गेले होते ते परतीच्या प्रवासात लोणावळा टोल नाक्यावरील स्वच्छता गृहात गेले असताना तेथेच आपला महागडा आयफोन १२ विसरले त्यानंतर त्यांच्या लक्षात आल्या बरोबर ते परत तेथे जाऊन शोध घेतला असता तो तेथे सापडला नाही दुसऱ्या दिवशी चेंबुर क्राईमब्रांच युनिट क्र ६ येथून त्यांचे वडील भिवंडी शहरातील नामंकित जेष्ठ कॅमेरामन राजेंद्र धैसास यांच्या मोबाईल वर फोन आला की आपल्या कडील कोणाचा आयफोन हरवला आहे व तो आपण ओळख पटवुन घेऊन जाणे असे सांगण्यात येताच राहुल धैसास यांनी लगेच तेथे गेले असता, तेथील इमानदार पोलीस नाईक नितीन तुपे यांना तो आयफोन १२ सापडला होता त्यांनी आपले वरीष्ठ प्रभारी पोलीस निरिक्षक रविंद्र साळुंखे यांच्या हस्ते परत सोपवला त्यांना बक्षीस म्हणुन पैसे देताना त्यांनी ते नम्रपणे नाकारले त्यामुळे आजही मुंबई मधील पोलिसांची इमानदारी भिवंडीकरांना पाहावयास मिळाली असून भिवंडीतुन मुंबईमधील पोलीस नाईक नितीन तुपे यांचे कौतुक होत आहे.

## थोडक्यात वृत्तांत




**नोएडा येथे एनसीआयबी च्या १०व्या वार्षिक बैठक कार्यक्रमात डायरेक्टर जनरल, नॅशनल क्राइम इन्वेस्टीगेशन ब्युरो, नवी दिल्ली, भारत यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचे डायरेक्टर, चंद्रशेखरजी धोत्रे यांच्या हस्ते लातूर जिल्हयाचे सोशल क्राईम विभाग एनसीआयबीचे अधिकारी, शिरीशकुमार टी. शेरखाने यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करताना.**

### आनंदवाडी गौर येथे सर्वरोग निदान शिबीर

निलंगा : निलंगा तालुक्यातील आनंदवाडी गौर येथे ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ व साई क्रिटीकेअर हॉस्पिटल निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्धाटन डॉक्टर अरविंद भातांब्रे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभाग लातूरचे जिल्हा माहीती अधिकारी युवराज पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून निटूर जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी तथा संगायो समिती सदस्य सुरेंद्र धुमाळ सर, दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू भैय्या डगवाले, निलंगा तालुका कृषी अधिकारी राजेंद्र काळे, मनसे विद्यार्थी आघाडी लातूर शहराध्यक्ष बालाजी कांबळे जेष्ठ पत्रकार मोहन क्षिरसागर, आनंदवाडीच्या सरपंच वर्षा विष्णु चामे, गौरचे सरपंच विठ्ठल टोकले, सामाजिक कार्यकर्ते रमेश मोगरगे, पत्रकार राजकुमार सोनी, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे अध्यक्ष रविकिरण सूर्यवंशी, सचिव दत्तात्रय जी परळकर, लातूर शहराध्यक्ष अमोल जी घायाळ, किशोर दादा जैन, पंकज जैस्वाल, राजकुमार गुडाप्पे, अरूण हांडे, व्यंकटराव राऊतराव, माधव शिंदे, रमेश शिंदे, गंगाधर डिगोळे, असलम झारेकर आदीसह जिल्ह्यातील अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते. डॉक्टर अरविंद जी भातांब्रे साहेब यांनी आपल्या भाषणात रुग्णांनी घ्यावयाची काळजी विविध रोगामुळे होणारे परिणाम व उपचार यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या शिबिरात ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात रुग्णांची व्यवस्थित तपासणी करून रुग्णांना औषधोपचार करण्यात आले. या शिबिरातील तज्ञ डॉक्टर राजशेखर मेनगुले (एम.डी मेडिसिन साई क्रिटीकेअर हॉस्पिटल निलंगा) संदीप बिराजदार (औषध अधिकारी लातूर) राहुल गावकरे, गफूर येरोळे, शुभम जटाळे अभिषेक यांनी तपासणी करून औषध उपचार केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी ज्ञानोबा चामे, विष्णू चामे, रवि चामे व गुराळे श्रीराम यांनी परिश्रम घेतले.

### प्रा.बालाजी कारामुंगीकर यांना पी एचडी

अहमदपूर : यशवंत कनिष्ठ महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्रमुख प्रा. बालाजी कारामुंगी कर यांना हिंदी विषयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने नुकतीच पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचा ओम शांती विश्र्वविद्यालयाच्या प्रमुख छाया बहिणजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शासनाचा सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार विजेत्या आशा रोडगे, रामलिंग तत्ता पुरे,तुकाराम साबणे सह केंद्राच्या साधक , साधिका व मित्रपरिवार उपस्थित होते.

### लातूरमध्ये बेवारस मोटार सायकलींचा लिलाव

लातूर : पोलीस ठाणे, लातूर ग्रामीण येथील बेवारस असलेली एकूण ६२ मोटार सायकल यांचा लिलाव बुधवार दिनांक १९ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्याचे आयोजिले आहे. तरी ईच्छुकांनी पोलीस ठाणे,लातूर ग्रामीण येथे २००/- रुपये किंमतीच्या बाँडसह उपस्थित रहावे.असे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे लातूर ग्रामीण यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे बेवारस असलेल्या मोटारसायकलचा लिलाव करणेकामी प्रादेशिक परिवहन अधिकारी व तालुका दंडाधिकारी लातूर यांच्याकडून परवानगी घेतलेली आहे असे ही प्रसिध्दी पत्रकात नमुद केले आहे.

### लातूर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग त्वरीत द्यावा!

लातूर : महानगरपालिकेतील कर्मचार्यांना सातवा वेतन मिळावा याकरिता मनपा महापौर श्री विक्रांत गोजमगुंडे यांना प्रत्यक्ष भेट घेवून महाराष्ट्र राज्य नगर परिषद कामगार कर्मचारी संघटनेचे राज्य सल्लागार श्री शिवमुर्ती पवार व अध्यक्ष श्री अंकुश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. अधिक माहिती अशी की, नगर परिषद असतांना ४०८ कर्मचार्यांना अस्थायी म्हणून नेमणूक केली. २५ ऑक्टोबर २०११ मध्ये महापालिका अस्तित्वात आली. त्यानंतर २८ मे २०१३ च्या शासन आदेशान्वये १२४६ पदाचा अकृतीबंध नवनिर्मित महापालिकेकरिता पदे मंजुर करण्यात आली. त्यापैकी वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांचे पथक विभागात ८४९ पदे आहेत. त्यातील ४०८ कर्मचारी यांचे सप्टेंबर २०१९ मध्ये समावेश करण्यात आले. त्यानुसार ४०८ कर्मचार्यांना वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांचे पथक क्र.२ असे करून अस्थायी म्हणून ४०८ कर्मचार्यांना पगारपत्रके देत आहेत. याबाबत कर्मचार्यांना कसलीही माहिती दिली नाही. आदेशही दिला नाही. आकृतीबंधमध्ये वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांचे पथक असे असताना महापालिका क्र.२ अस्थाई समजले जाते. हा अन्याय आहे. असे निवेदनात लेखी दिले आहे. याबाबत संघटनेला त्वरीत माहिती द्यावी व आकृतीबंधमध्ये सर्व अस्थायी ४०८ कर्मचार्यांना वैद्यकीय स्वच्छता पथकमध्ये सामावुन स्थायी करावे व सर्व अस्थायी व ४०८ कर्मचार्यांच्या पाल्यास लाडपागे कमिशनद्वारे नियुक्तीचे आदेश द्यावे संघटनेचे सर्वश्री शिवमुर्ती पवार, जिल्हाध्यक्ष बालाजी कोंबडे, सचिव नारायण(नाना), अध्यक्ष अंकुश गायकवाड आदिंनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

10 TO 16 JANUARY 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 08/01/2022 8:56 PM Page 1



# केविलवाणी राजकिय स्टंटबाजी!

निवडणुका जिंकण्यासाठी राजकारणी कुठल्या थराला जातील याचा नेम नाही. पण निदान पंतप्रधान पदावर असलेल्या माणसाने तरी राजकीय स्टंट बाजी पासून दूर राहायला हवे होते. पंजाबच्या दौऱ्यावर असताना रस्त्यात फक्त त्यांच्या गाड्यांचा ताफा थांबवावा लागला. कारण तिथून जवळपास १ किमी अंतरावर शेतकरी निदर्शने करण्यासाठी उभे होते. मात्र या घटनेचा असा काही प्रचार करण्यात आला की जणू काही पंजाब मधील जनता आणि तिथले काँग्रेस सरकार पंतप्रधान मोदींच्या जीवावर उठले आहेत. असे चित्र भाजपच्या कार्यकर्त्यांनी निर्माण केले असते, तर ते साजण्यासारखे होते. पण पंतप्रधान मोदी यांनी स्वतः या घटनेचे जे भडक चित्र रंगवले ते योग्य नव्हते. काँग्रेस किंवा इतर राजकीय पक्ष भलेही त्यांचे विरोधक असले तरी पंतप्रधान पदाविषयी त्यांनाही आदर आहे. पंतप्रधान मोदी यांच्या सुरक्षेची त्यांनाही काळजी आहे. त्यामुळे त्यांच्याकडून पंतप्रधान मोदींच्या जीवाला धोका होईल हे कोणालाही पटणारे नाही. कारण पंतप्रधान मोदी यांचे विरोधक हे काही खलिस्तानी दहशतवादी नाहीत. त्यामुळे मोदींच्या सुरक्षेत झालेल्या त्रुटींचे भांडवल करून त्याचा निवडणुकीत फायदा उठवण्याचा प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही. कारण लोकांना सर्व समजत लोक काही मूर्ख नाहीत. भाजपचा एक नेते म्हणत होता की मोदींच्या ताफ्यावर दगडफेक झाली. फ्लायओव्हर पुलावर दगडी कोणी त्याच्या बापाने आणून ठेवल्या होत्या काय? चोळेगिरी करण्यासाठी काहीपण बोलायचे आणि हशा करून घ्यायचा हे आता म्हातारपणी तरी सोडा. भाजपमध्ये बुद्धिमान लोक आहेत असा डंका पिटला जातो. पण सत्तेच्या मोहापायी दुसऱ्या पक्षातले दगडधोंडे गोळा करून शक्तिप्रदर्शन करण्याचा भाजपचा प्रयत्न आता त्यांच्या अंगलट यायला लागला आहे. भारतीय लोकशाहीमध्ये कायदा हा सर्वांसाठी सारखा आहे असे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात ते काही खरे नाही. कारण इथे सामान्य माणसाला एक न्याय आणि राजकारणी बडे व्हीआयपी यांना वेगळा न्याय अशी व्यवस्था तयार करण्यात आली आहे. या देशात रोड रॉबरीचे अनेक प्रकार घडले आहेत. रस्त्यात गाड्या अडवून लोकांना लुटले जाते. प्रतिकार केल्यास त्यांना ठार मारले जाते. रोड रॉबरी आणि हत्या याची अनेक प्रकरणे देशात रोजच घडत असतात आणि त्यांचा फक्त एफआयआर दाखल होतो. पण अशा प्रकरणाचा आजवर ५० टक्केही निकाल लागलेला नाही. रस्त्यात गाड्या अडवून अनेक नेत्यांची हत्त्या झाली. महाराष्ट्रातील प्रख्यात कामगार नेते डॉ.दत्ता सामंत यांची रस्त्यात कार अडवून हत्या करण्यात आली. रोड रॉबरीची अशी किती तरी प्रकरणे आहेत जी देशाच्या वेगवेगळ्या भागातील पोलीस ठाण्यांमध्ये किंवा न्यायालयात धूळ खात पडली आहेत. ज्यांच्या बाबतीत हे घडले ते सुद्धा भारतीय नागरिक आहेत. पण त्यांची कधी तपास यंत्रणा किंवा प्रसार माध्यमांनी दखल घेतली नाही. पण बुधवारी पंजाब दौऱ्यावर असलेल्या मोदींच्या ताफ्याच्या रस्त्यात शेतकरी आंदोलक आले, तेही मोदी यांच्या ताफ्यापासून खूप दूर होते. मात्र या घटनेमुळे मोदींना २० मिनिटे पुलावर थांबावे लागले आणि तिथूनच मागे फिरावे लागले. या घटनेचा सध्या एवढा बाऊ केला जातोय, जणू काही शेतकऱ्यांनी मोदींच्या ताफ्याला घेराव घालून त्यांच्या जीविताला धोका निर्माण केला असे चित्र रंगवले जात आहे... जे हास्यास्पद आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अशा घटना कॅश करून त्यातून सहानुभूती मिळवण्याचा हा प्रकार खरोखरच योग्य आहे की अयोग्य ते आता जनताच ठरवील. पंतप्रधान मोदी यांच्या विषयी जनतेला आदर आहे. त्याच बरोबर प्रोटोकॉल नुसार पंतप्रधान ज्या मार्गाने जातात तो मार्ग मोकळा आणि सुरक्षित असायला हवा. पण बुधवारी तसे झाले नाही. त्यामुळे या प्रकरणाची निश्चितच चौकशी व्हायला हवी. पण या प्रकरणाला राजकीय वळण देऊन त्याचे खापर भाजप विरोधी पंजाब सरकारवर फोडणे ही निव्वळ निवडणुकीची रणनीती आहे... हे वेगळे सांगायची गरज नाही. कारण केंद्राच्या तीन काळ्या कायद्याच्या विरोधात गेले वर्षभर जे शेतकरी आंदोलन सुरू होते त्यात बहुसंख्य शेतकरी हे पंजाब-हरयाणा मधील होते. आता भलेही केंद्राने ते कायदे मागे घेतलेले असेल तरीही त्यासाठी वर्षभर लढा द्यावा लागला. या गोष्टीचा पंजाब-हरयाणातील शेतकऱ्यांना राग आहे. कदाचित त्याचं रागातून शेतकऱ्यांनी मोदींच्या समोर निदर्शने करण्याचा निर्णय घेतला असावा. मात्र त्यांच्याकडून मोदींच्या जीवाला धोका झाला असता असा अंदाज वर्तवणे चुकीचे आहे. कारण शेतकरी हे काही आतंकवादी नाहीत. पण शेतकरी आंदोलनात सरकारचे पाय चाटणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मिडियाकडून शेतकऱ्यांना आतंकवादी ठरवले होते. त्याचाही शेतकऱ्यांच्या मनात राग आहे. या सर्व गोष्टींचा पंतप्रधान महाशयांनी विचार करायला हवा होता. पण तसे न करता भटींडा विमानतळावर येऊन मी जिवंत परतलो, सांगा तुमच्या मुख्यमंत्र्यांना असे पंतप्रधान मोदींनी जे विधान केले ते त्यांच्या पदाला शोभणारे नव्हते. या विधानातून त्यांनी काँग्रेसची सरकारे असलेल्या राज्यात आपल्या जीवाला धोका आहे असे दाखवण्याचा जो प्रयत्न केला तो दुर्दैवी म्हणावा लागेल. शेतात दिवस रात्र घाम गाळून देशातील १३० कोटी जनतेला दोन घास भरवणारा शेतकरी हा काही खुनी किंवा दहशतवादी नाही. मात्र त्याला लोकशाही मार्गाने पंतप्रधान महाशयांना जाब विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण त्याचा पंतप्रधान महोदयांच्या सुरक्षेशी संबंध जोडून पंजाब मधील काँग्रेस सरकारला आणि तिथल्या शेतकऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नाही. शेवटी शेतकरी हा सुद्धा मतदार आहे. निवडणुकीत या सगळ्या गोष्टींचा मोदींच्या पक्षाला हिशोब द्यावा लागेल. राजीव गांधी पंतप्रधान असताना श्रीलंकेत त्यांच्यावर हल्ला झाला. त्या प्रकरणाचा काँग्रेसने कधीच ऐवढा बाऊ केला नव्हता. पुढे राजीव गांधींची तामिळनाडू मधील पेरांबदुर येथे हत्या झाली. मात्र त्या घटनेला जबाबदार धरून तामिळनाडू सरकार त्यावेळी बरखास्त करण्यात आले नाही आणि बुधवारी केवळ मोदींच्या ताफ्याच्या रस्त्यात शेतकरी आले तेही एक किमी दूर अंतरावर होते, त्यावरून आता राजकारण सुरू झाले आहे. पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेत चूक व्हायला नको होती. मात्र त्याबाबत चौकशी व्हायला हवी यात वाद नाही. पण या घटनेला राष्ट्रीय आपत्ती असल्याचा देखावा करून आता आरडा ओरडा करून निवडणुकीसाठी सहानुभूती तयार करणे चुकीचे आणि केविलवाणे आहे.

# प्रेमाच्या जाळ्यात अल्पवयीन मुली!

'मुलगी वाचवा', 'मुलगी शिकली प्रगती झाली' अशा शासकीय उपक्रमांमुळे हळूहळू सामाजिक स्थिती बदलताना दिसत आहे. मुलींना वाढवले जात आहे, त्यांना शिक्षण दिले जात आहे. ही चांगली स्थिती असताना दुसरीकडे मात्र मुली असुरक्षित असल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या साडेचार वर्षांत पुणे शहरातून दोन हजार अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेल्याचे समोर आले आहे. यामध्ये १४ ते १७ वयोगटातील मुलींचे प्रमाण सर्वाधिक असून, या प्रकारचे गुन्हे पालकांसोबत पोलिसांसाठीही डोकेदुखी ठरत आहेत.

वर्षानु-वर्षे 'मुलगी नको' ही भावना सामान्यांच्या मनात आणि प्रत्यक्षात होती. मुलगी का नको यामागे अनेक कारणे आहेत. मुलगी ही जबाबदारी, तिचे उद्या त्या मुलीचे काही बरे-वाईट झाले, तिचे पाऊल घसरले तर काय? कोण तिच्याशी लग्न करेल? असे प्रश्न त्यांच्या डोक्यात असतात. कशाला समस्या पाळा म्हणून मुलगी नको ही भावना खोलवर रुजत गेली. आता चित्र बदलले असले तरी समस्या काही थांबण्याचे नाव घेत नाही. राजधानी मुंबई महिलांसाठी असुरक्षित असल्याचे चित्र आहे. गृह विभागाच्या आकडेवारीनुसार मागील दोन वर्षात मुंबईतून २ हजार ३७१ मुली बेपत्ता झाल्या आहेत. तर टाळेबंदीच्या काळात नागपूर जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फूस लावून लग्नासाठी पळवून नेण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत होते, मात्र पुण्यातील मागील चाडेचार वर्षातील आकडेवारी धक्कादायक आहे.

**अल्पवयीन मुलींना पळवण्याच्या घटना**

२०१७- ४४६
२०१८- ४६१
२०१९- ३११
२०20- ३३८
२०२१- २३७ (मे)

सध्या पुणे शहरात दररोज एक तरी अल्पवयीन मुलगी पळून गेल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्यामुळे कोर्टाच्या आदेशानुसार अशा घटनांमध्ये पोलिसांकडून अपहरणाची तक्रार दाखल केली जाते. मुलीचा शोध घेतल्यानंतर ती मित्रासोबत पळून गेल्याचे लक्षात येते. जराशी समज येण्याच्या वयातच अल्पवयीन मुलींना प्रेमाची फूस लावून पळवून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ होत दिसून येत आहे.

मुलीचे पालक पोलिसांकडे मुलीचा शोध घेऊन, तिच्या मित्रावर गुन्हा दाखल करण्यास सांगतात. पोलिसदेखील काही प्रकरणांमध्ये मुलीचा शोध घेऊन, तिला परत घेऊन येतात. संबंधित मुलावर गुन्हा दाखल केला जातो. कधी-कधी पोलिसांना अशा प्रकरणांत बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा लागतो. यामध्ये मुलीच्या पालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. काही वेळा पालक मुलीच्या भविष्यासाठी तडजोड करण्यास तयार होतात. त्यामुळे दाखल केलेले गुन्हे मागेदेखील घेतले जातात. मात्र, यामध्ये पोलीस यंत्रणा कामाला लागते.

प्रेम प्रकरणात पळून जाणाऱ्या मुली १४ ते



१७ वयोगटातील आहेत. त्यांना भविष्याबाबत एवढी जाण नसते. त्यामुळे त्या गुंड, मवाली मुलांच्या प्रेमाच्या जाळ्यात सहज ओढल्या जातात. या वयात शारीरिक बदल होतात. सोशल मीडिया, चित्रपटांमधील हिरोगिरीच्या आकर्षणाचा त्यांच्यावर परिणाम होतो. त्यामुळे मुली पालकांचा विचार न करता पळून जातात. मात्र, आयुष्यात पुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना त्यांना येत नाही. काही मुली संबंधित मुलासोबत लग्न करून संसार करतात. पण, काहींना आयुष्यभर या घटनेचा प्रश्चाताप करण्याची वेळ येत असल्याचे दिसून आले आहे, असे ॲड. सुप्रिया कोठारी यांनी सांगितले.

### न्यायालयाकडून धाक निर्माण करण्याचा प्रयत्न

'अल्पवयीन मुलगी पळून गेल्यानंतर मुलीसोबत संबंध आल्याचे आढळून आल्यास अशा प्रकरणात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जातो. पूर्वी अशा गुन्ह्यांत मुलीच्या भविष्याचा विचार करून पालकांचे प्रतिज्ञापत्र दिले जात होते. काही गुन्ह्यांत पालक फितूर झाल्यास गुन्ह्यात पुढे काहीच होत नव्हते. पण, कोर्टानेदेखील हे प्रकार गांभीर्याने घेतले आहेत. बाल लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात कोर्ट समझोता घडविण्यास तयार होत नाही; तसेच आरोपीचा जामीन फेटाळला जातो. पोलिसांनीही अशा प्रकरणांत गुन्हे दाखल करून धाक निर्माण करावा. त्यामुळे या घटना कमी होतील,' असे ॲड. सुप्रिया कोठारी यांनी सांगितले.

### पालकांचे होतेय दुर्लक्ष

कामासाठी बाहेर पडल्यानंतर काही आई-वडिलांचे त्यांची मुले काय करतात याकडे लक्ष नसते. घरी असलेले काही आई-वडीलही त्यांच्याच नादात असतात. त्यामुळे पालकांचा मुलांसोबतचा संवाद कमी होत आहे. कामावरून आल्यानंतर सतत मुलांवर ओरणे, चिडचिड करणे यामुळे मुले पालकांपासून दूर जातात; तसेच पालकांकडे मुले मन मोकळे करीत नाहीत, असे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले. अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्यानंतर अशा घटनांमध्ये अपहरणाचा गुन्हा दाखल केला जातो. या घटनांमध्ये प्राधान्याने या मुलींचा शोध घेऊन त्यांना पालकांच्या ताब्यात दिले जाते. त्यासाठी सामाजिक सुरक्षा विभागामार्फत काम केले जाते. पोलिस ठाण्याच्या पातळीवरही मुलींचा तत्काळ शोध घेतला जातो.

# पत्रकार दिन आणि बाळशास्त्री जांभेकर



मराठी पत्रकार सृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी आज दर्पण सुरु केले. तो दिवस आपल्या राज्यात आज पत्रकार दिन म्हणून ओळखला जातो. काय योगदान होतं बाळशास्त्री जांभेकराचं हे कळावं म्हणून आजच्या दिनाचं औचित्य साधून त्यावर प्रकाश टाकतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, ज्या समाजाला आपला इतिहास माहिती नाही तो समाज भविष्य घडवू शकत नाही. म्हणून अशा थोर व्यक्तींची माहिती मिळाली पाहिजे म्हणून हा लेख प्रपंच!!

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म २०, फेब्रुवारी १८१२ चा, मुंबईत १८२५ साली आले. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीत शिक्षण घेऊन केवळ त्यांच्या बौद्धिक सामर्थ्यावर वयाच्या २० व्या वर्षी एलिफ़िस्टन कॉलेज मध्ये सह प्राध्यापक झाले. कदाचित भारतातील पहिले प्राध्यापक असावेत जे इंग्रजी शिकवत अनेक लिप्यांचे अभ्यासक असल्यामुळे कोकणातील प्राचीन शिलालेख आणि ताम्रपट यांचा अभ्यास करून त्यांनी शोध निबंध लिहले. त्यामुळे भारतातील पुरातत्व विषयाचे पहिले अभ्यासक म्हणूनही त्यांचं नाव आहेच. संत ज्ञानेश्वरांनी लिहलेली ज्ञानेश्वरी मराठीतून मुद्रित करून समस्त मराठी भाषकांच्या घराघरात ज्ञानेश्वरी पोहचविण्याला मोठा हातभारही जांभेकरांनी लावला. गणित आणि खगोलशास्त्रातली त्यांची गती ओळखुन तत्कालीन सरकारने त्यांना कुलाबा वेध शाळेचे संचालक म्हणूनही नियुक्त केलं होतं. सर्व विषयांचा सखोल अभ्यास असलेल्या जांभेकरांना मुंबई इलाख्याच्या शिक्षण विभागाचे अधिकारी म्हणूनही तत्कालीन सरकारने त्यांची नियुक्ती केली. त्याकाळात त्यांनी मराठी भाषेत पाठयपुस्तक लिहली. ते पत्रकार होते, साडेआठ वर्षे त्यांनी दर्पण चालवले त्यांनतर दिग्दर्शन नावाचे पूर्णपणे शिक्षणाच्या प्रसाराला वाहिलेले मासिक काढले. त्यात त्यांना त्यांचे विद्यार्थी दादाभाई नौरोजी आणि भाऊ दाजीलाड यांनी मदत केली होती. पत्रकार दिना निमित्त माध्यमात काम करणाऱ्या सर्वाना हार्दिक शुभेच्छा!!

**- युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# नागरिकांनी प्रशासनाच्या सुचनांचे पालन करावे -जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**

देशात कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. आपल्या जिल्ह्यातही रुग्णांची संख्या वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामध्ये मागील चार दिवसापासून पॉझिटिव्हीटीचा रेट वाढत आहे. दि. ६ जानेवारी, २०२२ रोजीचा संसर्गाचा दर ३.६३ टक्के इतका आहे. ही तिसऱ्या लाटेची सुरुवात आहे. कोविड- १९ प्रतिबंधासाठी नागरिकांनी मास्क, सॅनिटायझरचा वापर करुन गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, अनावश्यक प्रवास व त्रिसुत्रीचे पालन करावे. लग्न तसेच इतर कार्यक्रमात ५० पेक्षा नागरिकांना एकत्र येण्यास प्रतिबंध आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी केले आहे.बऱ्याच नागरिकांना कांही लक्षणे दिसत आहेत, ताप, सर्दी, खोकला असतो परंतु कांही नागरिक तपासणीसाठी घाबरत आहेत. तपासणीसाठी घाबरु नये, शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गृह विलगीकरण सुविधा उपलब्ध आहे. याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करु नये. कुठलाही ताप, खोकला, अशक्तपणा अशी लक्षणे दिसली तर, जवळच्या तपासणी केंद्रावर जावून तपासणी करुन घ्यावी.नवीन ओमायक्रॉन वायरसची संसर्ग क्षमता खूप जास्त आहे. याची लक्षणे पुर्वीसारखी आहेत. पण याची सुरुवात अशक्तपणापासून होते. यावर एकच उपाय म्हणजे लसीकरण आहे. ज्या नागरिकांनी दोन्ही लसीकरणाचे डोस घेतले आहेत, त्यांना संसर्ग झाला तरी सौम्य असेल आणि त्यापासून आपण सुरक्षित राहू. ज्यांचा दुसरा डोस प्रलंबित आहे, त्यांनी तात्काळ लसीकरणाचा दुसरा डोस करुन घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.दिनांक ३ जानेवारी, २०२२ पासून वयोगट १५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण सुरु केले आहे. जिल्ह्यात याला चांगला प्रतिसाद आहे. या वयोगटातील ३० टक्के झाले आहे. ७० टक्के उर्वरित शिल्लक आहे. १५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन त्यांना जवळच्या लसीकरण केंद्रावर जावून लसीकरण करुन घेण्याबाबत प्रवृत्त करण्याबाबतही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी जिल्ह्यातील नागरिकांना, पालकांना, शिक्षकांना आवाहन केले आहे.परदेशातून किंवा देशातील कोणत्याही महानगरातून प्रवास करुन लातूर जिल्ह्यात आलेल्या नागरिकांनी प्रथम आरटीपीसीआर चाचणी करुन घ्यावी. कोविड संसर्ग होवू नये यासाठी जिल्हा प्रशासन सर्वोत्तोपरी प्रयत्न करत आहे. शासकीय रुग्णालयात कोविड -१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्र्वभूमीवर वैद्यकीय सुविधा, ऑक्सिजन पुरवठा, मनुष्यबळ याबाबतची सुसज्जता झाली असल्याचेही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण असेल माहिती द्यावयाची असेल त्यासाठी येत्या दोन ते तीन दिवसात टोल फ्रीचीही व्यवस्था करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले आहे

# हिरकणीच्या प्रांताध्यक्षपदी प्रतिभाताई पाटील कव्हेकरांची वर्णी

लातूर : ऑल इंडिया लिनेस क्लबस् ही महिलांसाठी काम करणारी सामाजिक संघटन आहे. या लिनेस क्लबस्च्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, अनाथ मुले, वंचित अशा सर्वच घटकातील महिलांना न्याय देऊन स्वावलंबी बनविण्याचे काम केले जाते. त्या सामाजिक संघटनेत गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर या अविरत काम करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन ऑल इंडिया डिस्ट्रीक्ट एमएच-५ हिरकणीच्या अकोला येथील कार्यक्रमात ऑल इंडिया डिस्ट्रीक्ट एमएच-५ हिरकणीच्या प्रांताध्यक्षपदी सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे. यावेळी ऑल इंडिया डिस्ट्रक्ट एमएच -५ हिरकणीच्या मल्टिपल अध्यक्षा लि.नलीनीजी पारीख, लि.इंदूजी मेहता, लि.मंजिरीजी कुलकर्णी, लि.सुनिलाजी नरप्पनरा, लि.शोभनाजी वांदिले, लि.हारविंदरकौरजी शेठी, लि.उषाजी बाहेती, लि.डॉ.ताराजी माहेश्वरी, लि.कल्पना देशमुख, लि.राजेश्री देशमुख, लि.सुनंदा गुप्ता, लि.नंदा सोलार, लि.ममता सूर्या आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या. तसेच लि.अर्चना नलावडे, लि.रागिणी यादव, लि.साधना पळसकर, लि.प्रा.डॉ.उमा मिरजगावे, लि.ॲड.रजनी गिरवलकर, लि.सुवर्णा महाजन, लि.कविता जाधव, लि.मंगल घाडगे, लि.हालिंगे, लि.महानंदा रासुरे, लि.जगदेवी वारद, लि.स्वरूपा करपे, लि.श्रध्दा पाठक, लि.नर्मदा वारद, लि.संगिता ढगे, लि.विभा पुरवंत, लि.सिंधू कावळे यांच्यासह लातूरच्या २५ लि. सदस्या उपस्थित होत्या.

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षणाची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध!

**लातूर/प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे निर्देशानुसार दिनांक ०१ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आलेला होता. या पुनरिक्षण कार्यक्रमानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर २०२१ ते ०५ डिसेंबर २०२१ पर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात आले व सदर दावे व हरकती वर निर्णय घेण्यात येऊन अंतिम मतदार यादी दिनांक ०५ जानेवारी २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय सर्व मतदान केंद्र व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाचे संकेतस्थळ https://ceo.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आली आहे. या कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यात ०६ विधानसभा मतदारसंघांतर्गत दिनांक ०१ जानेवारी २०२२ रोजी १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली. त्यानुसार लातूर जिल्ह्यात एकूण ४८९४३ (पुरुष मतदार - २६७९३ + स्त्री मतदार-२२१४०+इतर १०) मतदारांची वाढ झालेली आहे. अगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत सदर नवमतदार यांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्याचा हक्क मिळणार आहे. तसेच,जुन्या मतदार यादीतील दुबार नावे वगळणे, मतदारांच्या विनंती अर्जानुसार नावामध्ये दुरुस्ती करणे, विधानसभा मतदारसंघांतर्गत नाव स्थलांतर करणे ई.कामेही करण्यात आली आहेत.

लातूर जिल्ह्यातील विधानसभानिहाय मतदार संख्या :- विधानसभा मतदारसंघ, पुरुष, महिला, इतर व एकुण पुढील प्रमाणे आहे. २३४- लातूर ग्रामीण पुरुष-१७१४००, महिला-१५१३२९, इतर-१, एकुण- ३२२७३०, २३५- लातूर शहर- पुरुष-१९१२०४, महिला-१७४५५७, इतर-८, एकुण-३६५७६९,२३६-,अहमदपूर-पुरुष-१७३३४०,महिला-१५२१८६, इतर-१, एकुण-३२५५२७, २३७-उदगीर (अ.जा.) पुरुष-१६०२९५, महिला-१४१८७८, इतर-२, एकुण-३०२१७५, २३८- निलंगा- पुरुष-१६८७१७, महिला-१४९९९५,इतर-३, एकुण- ३१८७१५, २३९- औसा- पुरुष-१५३०१८, महिला-१३३८६८, इतर-२,एकुण- २८६८८८ विधानसभा मतदारसंघ एकुण- पुरुष १०१७९७४, महिला-९०३८१३, इतर-१७, एकुण-१९२१८०४. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. व उपजिल्हा निवडणूक अधिकारी सदाशिव पडदुणे यांचे मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यात ०६ विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे माध्यामातून प्रत्येक मतदान केंद्रावर नवीन मतदार नोंदणी करण्यात आली आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

10 TO 16 JANUARY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 08/01/2022 8:57 PM Page 1



# सोलापूर जिल्ह्यात पाच लाखांसाठी केले मुलांचे अपहरण



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अपहरण करण्यात आलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील आठ वर्षाच्या मुलाची पोलिसांनी सांगली येथील कुडाळ येथून सुटका केली आहे. पाच लाख रुपयांसाठी पाच जणांनी त्यांचे अपहरण केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून पाचही जणांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. नितीन उर्फ चार्ली धोंडाप्पा शेडशाळ, लक्ष्मण किसन चव्हाण (२७), केदार बाळासाहेब शिवपुजे (२०), संतोष धोंडाप्पा शेडशाळ (२७), रमेश भीमगोंडा बिरादार (३८) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यातील संतोष शेडशाळ हा मुख्य आरोपी आहे. धोत्री येथील आठ वर्षाचा मुलगा पृथ्वीराज सुरेश बिरादार रा. धोत्री ता. दक्षिण सोलापूर जि सोलापूर याला अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता फूस लावून पळवून नेले होते. पृथ्वीराजची मावशी सरुबाई माकप्पा आरकीले रा.धोत्री यांचेकडे गेल्या एक वर्षापासून राहणेस होता. त्याची आई गौरा सुरेश बिराजदार ही तिच्या माहेरी माड्याळ ता. जत जि. सांगली येथे राहत होती. सदर अपहरण झालेल्या मुलाचे वडील मयत असून ते मूळचे रा. मुधोळ जि. बेळगाव राज्य कर्नाटक असून सोन्याचा व्यवसाय करत होते. मुलगा पृथ्वीराज हा शिक्षणाकरीता सिद्धेश्वर इंग्लिश प्रशाला, तुळजापूर वेस सोलापूर इयत्ता २ री मध्ये शिकत होता. ३० डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता शाळेला जाण्याकरिता पृथ्वीराज घरातून निघून गेला, परंतु दुपारी शाळा सुटली व तो नेहमी यायची वेळ झाली तरी घरी परतला नाही म्हणून बस ड्रायव्हर योगीराज आरकीले यांना फोन करून मावशीने चौकशी केली असता पृथ्वीराज हा सकाळी बस मध्ये शाळेला आला नाही. त्यानंतर त्यांनी आजूबाजूला याबाबत चौकशी केली व तो हरविला असल्याची खात्री झाल्यानंतर अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता फूस लावून पळवून नेले होते. याबाबत वळसंग पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, अक्कलकोटचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, सोलापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी अतुल भोसले यांनी तात्काळ गाव ग्रामसुरक्षा यंत्रणेद्वारे सोलापूर, सातारा, सांगली, पुणे जिल्ह्यात तसेच कर्नाटकात कन्नड भाषेमध्ये ही माहिती प्रसारित केली त्याचप्रमाणे विविध सोशल मीडियाद्वारे बालकाचा शोध होण्यासाठी फोटो व्हायरल केले. त्याचप्रमाणे वळसंग पोलीस ठाण्याची पाच पथके तयार केली होती. या पथकांनी वेगवान तपास करून पीडित मुलाच कुडाळ सांगली येथून एका आरोपीच्या ताब्यातून मुक्त केले. यातील अन्य आरोपींना पलूस सांगली व हल्लोर बेळगाव या ठिकाणावरून तपासासाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. या आरोपींनी पाच लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा उद्देशाने पृथ्वीराजचे अपहरण केल्याची कबुली दिली आहे. अटक केलेल्या आरोपींना, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी प्रभारी अधिकारी भोसले व तपास पथकाने केलेल्या कामाचे कौतुक तसेच धोत्री ग्रामस्थांनी पोलिसांचा मोठा उत्साहात सत्कार केला. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले, सायबरचे पोलीस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, अजय हंचाटे, तसेच कर्मचारी सहाय्यक फौजदार म्हाळप्पा सुरवसे, वाळूजकर, हवालदार दासरी, संजय जमादार, फिरोज इनामदार, रमेश माने, पोलीस नाईक रामदास मालचे, भोसले, बंदीछोडे, पोलीस शिपाई गायकवाड, व्हनमोरे, पाटील, रेड्डी, खंडू माळी, रतन जाधव, मांढरे, प्रमोद गायकवाड, बनकर, निलेश वरम आदींनी केली आहे. सदर गुन्ह्यांचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले हे करीत आहेत. व्यवसायातील नुकसान यामुळे केले अपहरण. पृथ्वीराज बिराजदार यांचे मूळ गाव विजयपूर जिल्ह्यातील बेळगामी असून तो धोत्री येथे मावशीकडे शिकायला होता. गुरुवारी सकाळी तो सोलापूर येथील शाळेत गेला, पण संध्याकाळी घरी परत आला नाही. त्यामुळे मुलाचे काका मलकप्पा यारगले यांनी पोलिसात फिर्याद दिली. मुलाच्या आईचा जत तालुक्यातील माडग्याळ येथे भागीदारीमध्ये व्यवसाय आहे. व्यवसायात नुकसान झाल्याने आर्थिक देवाण-घेवाण यामुळे पृथ्वीराज याचे अपहरण केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

देशाबाहेरही वसई-विरारची चमकदार कामगिरी

## बॅन्कॉक, थायलंड येथे पार पडलेल्या ऑनलाईन वर्चुअल स्पर्धेमध्ये ४ स्पर्धकांना मिळाले कांस्य पदक



**वसई/प्रतिनिधी**

२० ते २२ नोव्हेंबर बॅन्कॉक, थायलंड येथे पार पडलेल्या वर्ल्ड वर्च्युअल युथ फेस्टिवलमध्ये युनायटेड थ्रू स्पोर्ट्सद्वारे आयोजित केलेली ऑनलाईन वर्चुअल स्पर्धेत एरोफिट टीम इव्हेंटमध्ये भारतातर्फे वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशनचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तीन संघ निवडले गेले होते. त्यामधील दोन संघांनी अंतिम टप्प्यात पोहचत भारताला कांस्य पदक मिळवून दिले. ही बाब महाराष्ट्र तसेच पालघर जिल्ह्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे. १८ वर्षा खालील संघात राहुल खुबट्या व अक्षय महाजन यांनी कांस्यपदक जिंकले तर १४ वर्षाखालील संघात अग्रीमा देवलाल व वेल्मा रेमेडीयस ह्यांनी कांस्यपदक जिंकले विषेश म्हणजे हे भारत संघाला विजय मिळवून देणारे चारही विद्यार्थी एकाच क्लासेसमध्ये शिक्षण घेत असून त्यांचे प्रशिक्षक सूर्यप्रकाश मुंडापाट हे आहेत. जे ह्या मुलांच्या मागे नेहमीच खुप मेहनत घेतात. त्यांच्या मेहनतीचे फळ आणि मुलांची भरपुर मेहनत या मुळेच ही मुले आज इथपर्यंत पोहोचली आहेत. या दोन्ही विजेत्या संघास वाको इंडियाचे अध्यक्ष संतोष कुमार अग्रवाल, सेक्रेटरी डॉ. संजय यादव, उपाध्यक्ष कार्तिक डाकवा, खजिनदार अभिषेक जैन, किकबॉक्सिंग स्पोर्टस असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष नीलेश शेलार, सचिव धीरज वाघमारे यांनी पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## भिवंडी नजीक खोणी येथे इमारतीची गॅलरी कोसळून एक पादचारी ठार

भिवंडी : खोणी ग्रामपंचायत हद्दीतील खाडीपार येथील एका इमारतीची रस्त्याच्या बाजूने असलेली गॅलरी कोसळून झालेल्या अपघातात एक पादचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. खाडीपार येथे एक एक दोन मजली इमारत असून त्याच्या तळमजल्यावर सागर किनारा हॉटेल आहे, तर त्याच इमारतीच्या पहिल्या मजल्यावर हॉटेल मधील कामगार राहत असून दुपारच्या सुमारास या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या गॅलरीचा रस्त्याच्या बाजूने असलेला सज्जा अचानक कोसळला त्याच सुमारास मूळ जव्हार येथील परंतु भिक्षा मागून चरितार्थ चालविण्यासाठी येथील आदिवासी पाड्यावर राहत असलेला शीडा दादू पढेर वय ७२ हा भिक्षेकरी त्याच सुमारास त्या ठिकाणाहुन जात असताना त्याच्या डोक्यावर गॅलरीचा ढिगारा पडल्याने वृद्ध भिकाऱ्याचा रक्तस्राव झाल्याने जागेवरच गतप्राण झाला. या घटने नंतर स्थानिक निजामपुरा पोलीस घटनास्थळी दाखल होत त्यांनी हॉटेल इमारत मालक शादाब हनी या विरोधात कारवाई सुरू केली आहे.

## रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनतर्फे गुणवंत नूतन रोटरी सदस्यांचा सत्कार संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरातील रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन तर्फे रोटरी वर्ष २०२१-२२ मधील गुणवंत नूतन रोटरी सदस्यांचा नुकताच सत्कार भालचंद्र ब्लड बँक येथील सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रोटरीच्या प्रथेनुसार राष्ट्रगीत घेण्यात आले त्यानंतर मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. सर्वप्रथम महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रोफेसर ही सर्वोच्च पदवी विद्यापीठ तज्ञ समितीद्वारे देण्यात आली त्याबद्दल त्यांचा सत्कार रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे माजी प्रांतपाल डॉ.विजयभाऊ राठी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच क्लब मधील नूतन सदस्य माधव पांडे यांना भारतीय आयुर्विमा महामंडळा तर्फे देण्यात येणारा जागतिक पातळीवरील एम.डी.आर.टी. (यु.एस.ए.) २०२२ हा पुरस्कार प्राप्त झाला त्याबद्दल त्यांचा सत्कार विवेकानंद रुग्णालयाचे ज्येष्ठ व प्रसिद्ध सर्जन डॉ.गोपीकिशन भराडिया यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर गणपत श्रीचंद अग्रवाल व बालाजी नानासाहेब घाडगे या दोन नवीन सदस्यांचा सत्कार क्लबचे माजी अध्यक्ष डॉ.मल्लिकार्जुन हुलसुरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर चारही सत्कार मूर्तींनी आपआपली मनोगते व्यक्त केली आणि उपस्थित सर्वांनी सत्कारमूर्तींचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांध्ये मोफत सॅनिटरी पॅड व इन्सिनेटर वाटप या प्रकल्पाची सविस्तर माहिती डॉ.विजयभाऊ राठी यांनी दिली. रोटरीतर्फे देण्यात येणाऱ्या नेशन बिल्डर अवार्ड संबंधी माहिती अध्यक्ष डॉ.संजय गवई यांनी दिली. या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे सदस्य प्रा.गुणवंत बिरादार, नितीन जगताप, धनंजय राऊत, विश्वनाथ स्वामी (सावळे), प्रतिमा कांबळे, प्रा.विद्या आचार्य, शेख शमशोद्दीन आणि सतीश मस्के यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अध्यक्षिय समारोप डॉ.संजय गवई यांनी केले तर आभार सचिव नीलकंठ स्वामी यांनी मानले.

## कर्जत पोलिसात विवाहितेची तक्रार; बलात्काराचा गुन्हा नोंद; आरोपी फरार

**कर्जत/धर्मानंद गायकवाड**

रायगड जिल्ह्यातील कर्जत पोलिस ठाण्यात एका प्रियकराने आपल्याच विवाहीत प्रेयसीस तिच्या नवऱ्यापासुन घटस्फोट घेणेस सांगुन तिला लग्नाचे आमिष देवुन तिच्यासोबत वारंवार शारीरीक संबंध करणाऱ्या प्रियकरावर बलात्कार व फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेने कर्जत तालुक्सात खळबळ माजली असुन आरोपी फरार झाले आहेत. या बाबत विवाहीत महीलेने दाखल केलेल्या फिर्यादीनुसार माहीती अशी की, सदर पिडीत महीलेचा विवाह २०१२ साली सालवड येथिल एका तरुणाबरोबर झाला होता. विवाह झालेपासुन २०१५ पर्यत या महीलेचे वैवाहिक जीवन सुरलीत चालु होते, मात्र २०१५ नंतर ही विवाहीत महीला आपल्या मुलास कडाव येथिल शाळेत सोडायला व घ्यायला जायला लागली. त्याच वेळेस इतर शाळेचा स्कूलबसही येथुन जा ये करायचा, त्याचवेळी नेरळ स्कूलबसचा ड्रायव्हर प्रतिक राजेश कदम याचा सोबत तिची ओळख झाली. त्यांनतर मैत्री झाली, रोज ही महीला आणि प्रतिकचे बोलणे भेटणे चालु झाले आणि या मैत्रीचे गाड प्रेमातही रुपांतर झाले. त्यानंतर २०१६ मध्ये प्रतिक कदम याने या विवाहीत महीलेचा लग्नाचे प्रपोज केले. मात्र सदर पिडीत महीलेने प्रतिक यास समजावले, मात्र तो समजुन घेणेचा मनस्थितीत नव्हता. प्रतिक या महीलेला वारंवार फोन करीत असायचा, तसेच भेटायलाही बोलावत असायचा. अखेर एक दिवस या विवाहीत महीलेने प्रतिक यास कडाव गणपती मंदीरात बोलावून घेतले व या महीलेने तिचे लग्न झाले असल्याचे त्याला सांगुन ती तिच्या संसारात सुखी असल्याचेही तिने प्रतिकला सांगत पुन्हा समजावले. तसेच तिला त्रास न देणेचीही विनवणीही या महीलेने त्याला केली.

मात्र या महीलेने प्रतिक याला मी विवाहीत आहे तरीही मी जर तुला आवडत असेन तर तु माझ्याशी लग्न कर असे सांगताच त्याने तिल होकार दिला, तसेच या महीलेला तिच्या नवऱ्यापासुन घटस्फोट घेणेस सांगितले. तसेच या विवाहितेला लग्नाचे वचन देवुन तिच्यासह तिचा मुलाचाही सांभाळ करणेचेही वचन प्रतिकने दिले होते. त्यामुळे या महीलेने त्याचेवर विश्वास ठेवला आणि त्यानंतर त्यांचा वेगवेगळ्या ठिकाणी भेटीगाठी सुरु झाल्या. त्यानंतर २०१७ मध्ये या पिडीत विवाहीत महीलेला प्रतिक याने आपल्या मोजे हुमगाव, तालुका कर्जत येथिल आपल्या मित्राचा घरी नेले व तिच्यासोबत शारिरीक संबंध केले. त्यानंतर नेहमीच वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या हॉटेलवरही या विवाहीत महीलेला तो घेवुन जावुन तिच्यासोबत तो वारंवार लग्न करण्याचे वचन देवुन शारीरीक संबध करीत असायचा अशी माहीती या पिडीत महीलेने फिर्यादीत कर्जत पोलिसांना दिली आहे. विशेष म्हणजे आरोपीपासुन या महीलेला दोन वेळा गर्भधारणाही झाली होती. मात्र या पिडीत महीलेने सदर बाब आरोपी प्रतिक यास सांगितले असता, त्याने तीस गर्भपात करण्यास सांगितलेचेही या महीलेने तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान २०१५ ते २०२० पर्यत सदर पिडीत महीलेचा पतीला याबाबत काहीच माहीत नसल्याचे या महीलेने पोलिसांना सांगितले आहे. घरात खोटे बोलुन ही महीला प्रतिक यांस भेटायला जात असायची, अखेर नोव्हेंबर/डिसेंबर २०२० मध्ये या पिडीत महीलेचा प्रेमसंबधाची माहीती तिचा नवऱ्यास झाली. तेव्हा सदर महीलेचा पती व नातेवाईकांना सदर महीला विवाहीत असुन तुझ्या पेक्षा वयानेही मोठी आहे, असे प्रतिक यास समाजावले व या महालेपासुन दूर होणेस सांगितले. मात्र प्रतिक याने तो या पिडीत महीलेवर प्रेम करीत असल्याने तो पिडीत महीलेसोबत लग्न करणार आसल्साचे त्याने सांगितल्यानंतर या महीलेनेही आपल्या नवऱ्यास घटस्फोट देणेची तयारी केली. तशी कल्पना तिने प्रतिक यास दिली, तेव्हाही प्रतिकने तिला लग्नाचे वचन दिले. प्रतिकचा मित्रानेही या विवाहीत महीलेला प्रतिक बरोबर लग्न केलेस तर सुखी होशील असे सांगितले. त्यामुळे तीचा विश्वास दृढ झाला. मात्र २२ डिसेंबर २०२१ रोजी प्रतिक या पिडीत विवाहीतेसोबत लग्न करण्यास तयार झाला असता, प्रतिकच्या घरच्यांनी व प्रतिकचा मित्र विकास भोसले यांनी प्रतिकला समजवल्याने प्रतिकने लग्न करण्यास नकार दिला. असेही या महीलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान प्रतिक यांनी या विवाहीत महीलेला नवऱ्याकडे परत जा, मला तुझ्याशी काही घेणेदेणे नाही असे सांगत तो निघुन गेला, तेव्हा पासुन त्याने या विवाहीत प्रेयसीचा मोबाईल नंबरही ब्लॉक केला, बोलणे भेटणे सोडुन दिले, त्यामुळे आपली फसगत झाल्याची कल्पना या विवाहीत महीलेला आल्याने तिने कर्जत पोलिस ठाणे गाठले आणि प्रतिक कदम यांचा विरोधात लग्नाचे अमिष दाखवून वेगवेगळ्या ठिकाणी नेवुन शरीर संबध करुन फसवणुक केल्याची तक्रार कर्जत पोलिस ठाण्यात दाखल केली, त्यामुळे या विवाहीत महीलेने कर्जत पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार कर्जत पोलिस ठाण्यात या प्रकरणी प्रतिक राजेश कदम आणि विकास भोसले रा. सालवड, ता. कर्जत यांचा विरोधात कलम ३७६, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे या घटनेने परीसरात खळबळ माजली असून आरोपी फरार झाले असून कर्जत पोलिस त्यांचा कसुन शोध घेत आहेत.

## विडी घरकुल येथे घरगुती गॅससह ११ लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील गोदूताई विडी घरकूल येथे अवैधपणे घरगुती गॅसचा काळाबाजार करत असलेल्या ठिकाणाहून ११ लाख ३९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तिघांना अटक करण्यात आली आहे, अशी फिर्याद स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार राजेश गायकवाड वय ४५ यांनी दिली आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे. वळसंग पोलीस ठाण्यात भाग ६ गुर नं.०८/२०२२ अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहसिन अलीम शेख (वय ३० रा. नवीन गोदूताई विडी घरकूल, कुंभारी ता.दक्षिण सोलापूर), वसीम सैपन शेख (वय ३४, रा.नवीन गोदुताई विडी घरकुल, कुंभारी ता. दक्षिण सोलापूर), व राजशेखर ऊर्फ राजू पंडीत कोळी वय २९, रा.आहेरवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीनुसार पथकाने गोदुताई विडी घरकुल येथे छापा टाकला. त्यावेळी एक इसम पत्र्याच्या शेडमध्ये घरगुती वापराच्या गॅस इलेक्ट्रॉनिक मशिनच्या साह्याने विनापरवाना भरत होता. त्या घरात व घरासमोर ११ भरलेला भारत गॅसच्या टाक्या अंदाजे किंमत ३३,००० हजार रुपये, एच.पी.कंपनीच्या पाच रिकाम्या गॅसच्या टाक्या अंदाजे किंमत १०,००० रुपये, तसेच दोन इलेक्ट्रिक मोटार अंदाजे किंमत ६००० रुपये, ३० फूट काळे केबल व त्यास पांढरा लाईटचा बोर्ड जुना वापरता किंमत अंदाजे ३०० रुपये, एक रेडमी कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल अंदाजे किंमत १०,००० रुपये, एक विवो कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत १५,००० रुपये, एक चार चाकी टाटा अल्ट्रा कंपनीची माल वाहतूक गाडी अंदाजे किंमत ९,००,००० रुपये, एक ऑटो रिक्षा काळ्या रंगाचा एम.एच.१३ जी ९१४० अंदाजे किंमत १,६०,००० रुपये, एक जुना इलेक्ट्रिक वजन काटा अंदाजे किंमत ५००० रुपये, गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारे नोझल अंदाजे किंमत ४५० रुपये असा ११ लाख ३९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावेळी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. याबाबत वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अजय हंचाटे हे करीत आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे तसेच सहाय्यक फौजदार राजेश गायकवाड, ख्वाजा मुजावर आदींनी केली आहे.

## रुद्र महिला मंडळाच्या वतीने सिंधुताई सपकाळ यांना श्रद्धांजली!




**अहमदपूर/प्रतिनिधी**

येथील रुद्र महिला मंडळ व दाक्षायणी महिला मंडळ यांच्या वतीने अनाथांची माय सिंधुताई सपकाळ यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून रुद्र महिला मंडळाच्या अध्यक्ष विजयाबाई चवंडा उपस्थित होत्या. आशा तत्तापुरे माहेश्वरी शेटकार, सिंधू निटूरे, आशा शेटकार, विजयाताई चवंडा यांनी सिंधुताई सपकाळ यांच्या जिवनावर प्रकाश टाकून संखोल मार्गदर्शन केले. यावेळी सचिव शांताबाई गिराम, शोभा शेटकार, शिवानी चंवडा, हारुबाई निटूरे, सुजाता गिराम, अरुणा कल्याणी, जया शिवपुजे, रंजना तत्तापुरे, अनुजा कल्याणी, सुजाता शिवपूजे सह सदस्या उपस्थित होत्या.

## घरात घुसुन गर्भवतीस बेदम मारहाण; कांदे बटाटे विक्रेत्यावर गुन्हा दाखल

**भिवंडी/आकाश गायकवाड**

एका कांदे बटाटा विक्रेत्याने पूर्ववैमनस्यातून २२ वर्षीय गर्भवती महिलेस शिवीगाळ करत घरात घुसून बेदम मारहाण केल्याने महिलेचा अनैसर्गिकपणे गर्भपात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हि घटना भिवंडी शहरातील कामतघर परिसरात घडली आहे. याप्रकरणी मारहाण करणाऱ्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुजित उर्फ लल्ला वर्मा असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपी कांदे बटाटा विक्रेत्याचे नाव आहे. या घटनेचे अधिक वृत्त असे की, आरोपी सुजित आणि पीडित फिर्यादीचे पती




अमर चौधरी यांच्यात १० ऑक्टोबर २०२१ रोजी किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. या भांडणाची पीडित महिलेच्या पतीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याच्या रागातून २ जानेवारी रोजी दुपारी साडे अकरा ते बारा वाजेच्या सुमारास पीडितेचा पती घरात नसताना आरोपी सुजित बळजबरीने घरात घुसून गरोदर पीडितेला अश्लील शिवीगाळ व धमकी देवून लाकडी दांडक्याने तिच्या हातावर ,कमरेवर, पायावर तसेच पोटावर जोरात लाकडी दांडका टोचल्याने पीडितेचा ८ आठवड्यांच्या गर्भाचा रक्तस्राव होऊन अनैसर्गिकपणे गर्भपात झाला आहे. या घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी आरोपी सुजितवर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि जी.व्ही.तुंबडा करीत आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हेगारांच्या आवळल्या मुसक्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने सराईत गुन्हेगाराला अटक केली असून दरोडा घरफोडी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत त्यांच्याकडून ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलिसांनी सराफाला देखील अटक केली आहे. अनिल मन्मथ शिंदे (३०) व सराफ बालाजी राजकुमार वेदपाठक (३२) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. फिर्यादी योगेश रामदास कापर हे मानेगाव ते नरखेड तालुका मोहोळ असे जात असताना रोडवर त्यांना अनोळखी इसमानी चाकूचा धाक दाखवून मारहाण करून गळ्यातील दोन टोळ्यांची चैन, तीन अंगठ्या व रोख रक्कम १ लाख ३० हजार असा एकूण २ लाख ९४ हजारांचा ऐवज लुटून नेला होता. याबाबत माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा दिवसा घडल्याने गुन्ह्याचे



गांभीर्य ओळखून तो तात्काळ उघडकीस आणण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्या होत्या हा गुन्हा वाळुज देगाव व जामगाव ता मोहोळ येथील रेकॉर्डवरील गुन्हेगारनी केला असल्याची माहिती पथकाला मिळाली. ते देगाव शिवारातील हॉटेल शंभूराजे च्या पाठीमागील गायरानामध्ये पाल टाकून वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने गायरानातून एकास ताब्यात घेतले त्याच्याकडे पथकाने कौशल्यपूर्ण तपास केला त्यांनी सांगितले की चार ते पाच महिन्यापूर्वी त्यांच्यासह इतर पाच आरोपींनी फिर्यादीस मारहाण करून त्याच्याजवळ सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटून सोने व रोख रक्कम आपसात वाटून घेतल्याचे सांगितले. त्याच्या कब्जात एक काळया रंगाची मोटरसायकल मिळून आली. त्याबाबत त्याच्याकडे विचारपूस केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. सदरची मोटरसायकल ही लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ हद्दीतील असल्याचे स्पष्ट झाले. त्याने सोलापूर तालुका पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी केल्याची माहिती मिळाली. या दोन्ही गुन्ह्यातील चोरलेल्या दागिन्याबाबत त्याच्याकडे विचारपूस करता सदरच्या दागिन्यापैकी काही दागिने त्याने काटी सावरगाव येथील वेदपाठक सराफास विकल्याची कबुली दिली. त्यामुळे त्यास अटक करण्यात आली. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, महिला मोहिनी भोगे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख यांनी केली आहे.

# अक्कलकोट काँग्रेस (आय) तालुका अध्यक्षासह २० जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील एका जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धाड टाकून ५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे, तर अक्कलकोट काँग्रेस तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे सह २० जणांविरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास शांभवी पॅलेस हॉटेल मध्ये घडलेली आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्यासह मन्सूर कादर पठाण (४५), सय्यद अजमेर शेकती शंकर सातलिंग गायकवाड (४६), श्रीमंत यल्लाप्पा विणलेले (३५), महादेव प्यार (३४), काशिनाथ धोंडप्पा कलवले (५१), भूपेंद्र मन्नू राठोड, अर्जुन तारासिंग चव्हाण (२०), बंदेनवाज सिंदगीकर (५५), कप्पा निंगप्पा मैत्री, विजयकुमार गुरप्पा घोडासार (५७), भगवानसिंग सुपर सिंग ठाकूर (३०), इमाम आमीर शेख (३०), मल्लांना सिद्धनाथ गड (५०), राजू हसनचा (२५), शिवाजी धनसिंग राठोड (३२), उमेश भीमच्या आधी मणी व एकोणतीस राहणार गोपाळपूर तालुका अफजलपुर पुंडलिक आप्पा आलमेलकर (३०) असे जुगार खेळणाऱ्या आरोपींची नावे आहेत. सर्वजण मिळून दुधनी येथील शांभवी हॉटेलमधील एका रूममध्ये जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकली. त्या ठिकाणी जुगार खेळत असताना रोख २ लाख ५७ हजार ८४० रुपयांचा बावन पत्त्याचा डाव १५ मोबाईल हँडसेट व ३ मोटरसायकल असा एकूण ४ लाख ९८ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक रवी सुनील माने यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक छबु बेरड करीत आहेत.



**वसईत जनहीत एक्सप्रेस या साप्ताहिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन दैनिक वसई विकास कार्यालयात करण्यात आले. यावेळी संपादक मच्छिंद्र एकनाथ चव्हाण वसई–विरार महानगर पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल रोकडे व सचिव विजय खेतले आणि कार्यालय प्रमुख तथा 'क्राईम संध्या' चे संपादक लक्ष्मणराव पाटोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मधुसूदन राणे, रघुनाथ कळभाटे, शहनाज शेख, इस्माईल शेख, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.**

# देवणी नगरपंचायतीच्या ४ प्रभागा करिता २४ उमेदवारी अर्ज वैद्य

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील नगरपंचायत ४ प्रभागा करिता होत असलेल्या निवडणुकीकरिता मंगळवार (दि.४) रोजी झालेल्या छाननी मध्ये १९ अर्ज अवैध ठरले तर २४ अर्ज वैध ठरले आहेत. प्रभाग क्रमांक ५ मधून काँग्रेसकडून तांबोळी जमीरमियाँ पाशामियाँ, भाजपा कडून टिळे पार्वती पंढरी, शिवसेनेकडून तांबोळी मुक्तार अलिमोद्दिन,महाराष्ट्र विकास आघाडी कडून टिळे कमलाबाई चंद्रकांत यांनी तर कांबळे शिवाजी वामन, शिंदे विद्यासागर माणिकराव ,तांबोळी मुजीब शरीफ यांचे अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज शिल्लक राहिले आहेत.प्रभाग क्रमांक ८ मधून काँग्रेस कडून सौ.कोतवाल रेणुका रमेश, भाजपाकडून कल्याणकर




वृंदावना प्रल्हाद, राष्ट्रीय समाज पक्षाकडून कल्याणकर अलकाबाई भानुदास यांचे तर शिवसेने कडून तांबोळी यास्मिन मुक्तार यांचे अर्ज आहेत. प्रभाग क्रमांक १० मधून भाजपाकडून निडवंचे किशोर गोविंदराव तर राष्ट्रवादी काँग्रेस कडून मुर्के अमरनाथ वैजनाथ, राष्ट्रीय समाज पक्षाकडून मिर्झा तजमील गौसबेग व शिवसेनेकडून शेख पीरपाशा महबूब यांचे तर भद्रशेट्टे विनोद उमाकांत, पालेकर देवीलाल रामराव, कल्याणकर बीरप्पा रेवणप्पा यांचे अपक्ष म्हणून अर्ज शिल्लक राहिले आहेत. प्रभाग क्रमांक ११ मधून भाजपाकडून राठोड तुळसाबाई मारुति काँग्रेसकडून लांडगे शारदा अश्विन तर शिवसेनेकडून पवार तुळसाबाई शिवाजी व महाराष्ट्र विकास आघाडीत कडून राठोड श्वेता दशरथ यांचा तर राठोड वर्षा रोहिदास व पवार रुक्मीणी दामू यांचे अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज शिल्लक राहिले आहेत, झालेल्या अर्ज छाननीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी शोभा जाधव व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार सुरेश घोळवे,एस.ए.बोंदर यांनी काम पाहिले.

# देवणी उपविभागीय महावितरण कार्यालयात सावित्री बाई फुले जयंती साजरी

**देवणी/प्रतिनिधी**

सावित्रीबाई जोतीराव फुले यांचा (जन्म ३ जानेवारी, इ.स. १८३१ रोजी झाले या भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. त्यांचे पती ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती यांनी १८४८ मध्ये भिडेवाड्यात पुण्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरूवातीच्या शाळांपैकी एक होती. देवणी



येथील महावितरण उपविभागीय कार्यालयात ३ जानेवारी रोजी सावीत्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून १९१वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महावितरण कार्यालयातील लीपीक श्रीमती कानाडे, आर. एस. प्रधान, तत्रंज्ञ घटकार डी.जी., पत्रकार शकिल मनियार, कृष्णा वजनम, के.जी.सतनुरे, परीट ए.व्हि., भद्रशेट्टे एस.एस., स्वामी के.पी., वाडकर एस.ए., नंदु कांबळे, बि.जी. भंडे सुरक्षा रक्षक आदि उपस्थित होते.

# कोयत्याने दोघांवर वार करत वसईत १५ लाखांचा दरोडा

वसई : हवालाचे सुमारे १५ लाख रुपये घेऊन जाणाऱ्या दोघांवर सहा ते सात दरोडेखोरांनी कोयत्याने वार करून महामार्गावरील चिंचोटी गावाच्या हद्दीत त्यांना लुटून नेल्याची घटना सोमवारी रात्री घडली आहे. वालीव पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला असून, पोलीस तपास करत आहेत. पेल्हारच्या दालमील कंपाऊंड येथे राहणारे पुरणसिंग राजपूत (वय ३१) आणि कारचालक प्रेमसिंग हे दोघे मालक रायसिंग राजपूत यांचे हवालाचे १४ लाख ९० हजार रुपये घेऊन सोमवारी संध्याकाळी मुंबईहून नालासोपाऱ्याला येण्यासाठी निघाले. त्यांची कार बंद पडल्याने टोईंग करून येत होते. रात्री नऊच्यासुमारास चिंचोटी गावच्या हद्दीतील सातीवली खिंडीच्या ओव्हर ब्रीजच्या पुढे आल्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन दरोडेखोरांनी दुचाकी आडवी लावली. त्याचवेळी त्यांच्या इतर चार ते पाच दरोडेखोरांनी पुरणसिंग यांच्या डाव्या हाताच्या बोटांवर कोयत्याने वार करून दुखापत केली. तसेच कारचालक प्रेमसिंग याच्या उजव्या पायाच्या गुडघ्यावर हत्याराने वार करून मारहाण केली. दरोडेखोर पैशांची बॅग आणि दोघांचे दोन्ही मोबाइल अशा एकूण १५ लाख रुपयांच्या मालाची चोरी करून पळून गेले. पुरणसिंग यांनी वालीव पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे.

पान १ वरून....

## चार मुलांच्या आईचा व्यभिचार वाढला...

मोठे आव्हान पोलिसां समोर असताना पोलिस उपअधीक्षक विकास नाईक यांनी तपासाची सूत्रे आपल्या हाती घेतला. मृतदेहाच्या शर्टावरील आयान फॉर मेन्स टेलर्स हा मार्का आढळून आला असता पोलिसांनी भिवंडीत या नावाने टेलर्स दुकानाचा शोध घेतला असता बागे फिरदोस येथे सदर दुकान आढळून आले. त्याच्या मदतीने शर्टाची व त्यानंतर मृतदेहाची ओळख पटविण्यात आली. तो मृतदेह सलाउद्दीन मोहम्मद युसूफ, वय ४२ विठ्ठल नगर येथील असल्याचे निष्पन्न झाले. तेथे जाऊन पोलिसांनी मृतदेहाच्या कुटुंबियांचा शोध घेत मृतदेहाची ओळख पटवली. त्यानंतर पोलिसांनी स्थानिकांना कडून माहिती घेतली असता त्याच इमारती मधील असजद अन्सारी वय ३२ ही व्यक्ती दफनविधी प्रसंगी हजर नव्हता ही बाब समोर आली असता त्याचा शोध घेतला असता तो पसार झाला होता पोलिसांनी त्याला नारपोली परिसरातून अटक करीत विश्वासात घेत चौकशी केली असता त्याने हत्येची कबुली दिली. असजद अन्सारी वय ३२ या विवाहित व्यक्तीचे मयत व्यक्तीच्या ३८वर्षीय पत्नी सोबत मागील सहा महिन्यां पासून अनैतिक संबंध होते.

त्यामध्ये पतीचा अडसर ठरत असल्याने पत्नी व प्रियकराने मिळून कट रचला मयत पती यास लघवीचा त्रास होत असल्याने खारबाव येथील ग्रामीण भागात त्यावर गावठी औषध मिळते ते घेण्यासाठी त्यास पत्नीने गळ घातली व त्यासाठी दोघे गेले असता त्या ठिकाणी आधीच येऊन थांबलेल्या प्रियकराने धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या करीत मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी तोंडावर दगड आपटून चेहरा विद्रुप केला होता. परंतु भिवंडी तालुका पोलिसांनी पोलीस उपअधीक्षक विकास नाईक यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी तालुका ग्रामीण पोलीस पथकाने कसून तपास करीत अवघ्या दोन दिवसात आरोपी पत्नी व प्रियकरास अटक केली असून न्यायालयाने त्यांना १४ जानेवारी पर्यत पोलीस कोठडी ठोठावली आहे.

## पैसे न दिल्याने दारुड्याचे डोके ...

करून तो कचरा स्क्रॅपवाल्याला विकून मिळणाऱ्या पैशातून आपला उदर निर्वाह करीत असतात. त्याचेकडे एखादी पिशवी त्यात चार दोन कपडे एवढाच त्याचा संसार असतो. कुणाशी काही बोलणे नसल्याने त्याचा जास्त परिचय ही त्या भागातील लोकांना नसतो. इचलकरंजी शहरातील डेक्कन चौकात मामू नावाचा फिरस्ता असाचा गेल्या काही वर्षापासून होता. मिळेल ते काम करायचे त्यातून मिळणाऱ्या पैशातून आपला उदरनिर्वाह करायचा असे त्याचे होते. डेक्कन चौकातील एका दुकानाच्या शेजारी तो रात्र आणि दिवस पडून असायचा. तो कुठून कधी आला याची फारसी माहिती कुणाला नव्हती. त्याने अजागळ पणे दाढी वाढवलेली होती. केस अस्तावस्त होते.अंगात कायम मळके पॅन्ट शर्ट असा त्याचा पेहरावा असल्याने काही लोक त्याला घाबरत ही होते. तो मिळेल ते काम करीत असल्याने काही जण त्याला इकडचे तिकडचे काम सांगून ते त्याच्याकडून करून ही घेत होते.त्या बद्दल्यात त्याला कुणी पाच पंचवीस रूपये देत होते.तो अर्धी हिंदी आणि अर्धी उर्दु बोलत असल्याने तो बहुदा मुस्लीम समाजाचा वाटत होता.त्याने कधी ही कुणाला आपले नाव गाव खरे पत्ता सांगितलेला नव्हता.त्याच्या बोलचालीवरून त्या भागातील लोक त्याला मामू म्हणून बोलवत होते. मामू या नावाने आता तो डेक्कन चौकात ओळखला जावू लागला होता. रात्रीच्या वेळी तो कुठे तरी काही तरी खावून आला की त्याच परिसरातील एका दुकानाच्या आडोशाला झोपत होता. डेक्कन चौकात रात्र आणि दिवस गर्दी असल्याने त्याला कसली झोप लागत नव्हती म्हणून तो रात्री अपरात्री उठून बिडी शिलगावून ती ओढत बसत होता. बिडी पिल्यानंतर त्याला कदाचित झोप लागत असावी म्हणून तो तसे करत होता.या मामूला तसे सर्वजण ओळखत होते. मामू ही प्रत्येकाला चेहऱ्याने ओळखत होता.त्याला कुठे तसे प्रत्येकाची नावे पत्ता माहित होता. पण तो ही कधी कधी त्याना शिव्या देऊन बोलवत असल्याने काही जणांना तो आपल्याला ओळख दाखवित असल्याचे वाटत होते. त्यापैकीच जवाहरनगर कोरवी गल्लीतील सचिन पाटील हा एक होता. सचिन हा अट्टल दारुडा होता. तो रात्र आणि दिवस दारू पित असल्याने तो घरात कधी थांबत नव्हता.त्याच्या घरची परिस्थीती ही तशी जेमतेमच होती. दारू पिऊन घरात भांडणे काढणे काही काममधंदा न करता राहणे एवढाच त्याचा उदयोग होता. त्याला कायमची फुकटची दारू प्यायला पाहिजे असायची. फुकटची दारू प्यायला मिळाली नाही तर तो दारू पिण्यासाठी कुणाकडून ही दारू प्यायला पैसे मागायचा. तो अट्टल पिंडका आणि दारूडा असल्याने त्याला बघून काही जण आपला रस्ताच बदलत होते. कारण हा समोर आला म्हणजे काही तरी गोड बोलून दादा मामा म्हणून पैसे मागणार आणि त्या पैशाची दारू पिणार हे बहुदा अनेकजणांना माहित होते. दारू पिण्याच्या वादातून सचिन पाटील याचे अनेकाच्याबरोबर बऱ्याच वेळेला वादावादी ही झाली होती. त्याला कुणी दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत तर तो सरळ सरळ त्याना तोंडावर शिव्या देत होता.त्याची ही सवय माहित असल्याने कशाला याच्या नादाला लागायचे म्हणून जो तो त्याच्यापासून लांबच राहत होता. दारू पिऊन आला की तो तासन तास लेक्चर लावत बोलत असायचा.तसा तो रिकाम टेकडा असणाऱ्या मामू बरोबर ही दारू पिऊन आला की बोलत बसायचा त्याच्याकडूनच बिडी घेऊन प्यायचा आणि त्यालाच उलट चार शहाणपणाच्या गोष्टी सांगायचा. मामूची आणि त्याची ओळख ही अशीच झाली होती. रात्री अपरात्री मामु दुकानाच्या आडोशाला झोपला असला की सचिन त्याला मामू म्हणून बोलावून उठवत होता. तो दारूच्या नशेत आहे हे मामू ओळखायचा त्यामुळे तो त्याला चुकविण्याचा प्रयत्न करीत असायचा पण सचिन हा त्याला गाठून त्याच्याबरोबर लेक्चर लावत बसायचा.त्यावेळी मामू त्याला आपल्याकडील खायला देवून माघारी पाठवत होता. मामुकडे खायला मिळते हे सचिनला माहित होते. गुरूवार दि.६ जानेवरी रोजी मामू हा दिवसभर इकडे तिकडे करून कंटाळलेला होता. त्यामुळे तो रात्री दुकानाच्या आडोशाला झोपला होता. त्याची एक झोप झाली होती.त्याचा डोळा लागत असताना सचिनने त्याला येवून उठविले. तसा तो जागा झाला. त्यावेळी सचिन हा जास्तच दारूच्या नशेत होता.तो झोकांडया खात मामूच्या समोर उभा होता. त्याला निट बोलता ही येत नव्हते. आणि उभे राहता ही येत नव्हते. त्याची ती अवस्था बघून मामू त्याला क्या बे, निंद मे से क्यो जगा राह हे मुझे म्हणत त्याला चार शिव्या घातल्या. त्यातच सचिन हा त्याच्याकडे दारूसाठी ३० रूपये मागू लागला. सचिन हा गावठी दारू पित असल्याने त्याला ३० रूपये पुरेसे होते. तो मामू मेरे को ३० रूपये दे दारू पिणे का है. सुबह १० बजे तुझे ३० रूपये वापस करता हूॅ म्हणाला, पण मामू त्याला म्हणाला, मेरे पास इतने पैसे नही है,फिर मै तुझे ३० रूपये दारू पिणे के लिए क्यो दुॅ.तु जा यहाॅ से मुझे निंद आ रही हे. मुझे तंग मत कर म्हणत तो त्याला तेथून घालवू लागला.पण सचिनला दारू पाहिजे असल्याने तो तेथून त्याचेकडून पैसे घेतल्या शिवाय जाणार नव्हता.तो तेथेच ताटकळत उभा राहीला पण मामू काही त्याला ३० रूपये दयायला तयार होईना. तो ही त्याचेकडून पैसे मागायचे काही सोडेना.हवेत गारठा पसरल्याने रस्त्यावर तशी तुरळकच गर्दी होती. अधून मधून एखादे वाहन हॉर्न वाजवित जात होते. त्या दोघात आता भांडण लागले होते. मामू त्याला गलिच्छ भाषेत शिव्या देत होता. पण सचिन काही तेथून जायला तयार नव्हता. सचिनला दारू मिळाली नाही की त्याचे हात लट लट कापत होते. तो तसाच थंडीत त्याचेकडे ३० रूपये मागत होता. तेवढयात सचिनचा दुसरा मित्र दंडोजी हा तेथे आला. त्या दोघातील भांडणे बघून तो काहीच बोलला नाही. मामूला तो चांगले ओळखत होता. म्हणून दंडोजीने त्यावेळी मामूकडे २० रूपये हात उसणे मागितले. दंडोजी हा ही दारू पित असल्याचे सचिन पाटील याला माहित होते. मामूने त्याला दारूसाठी २० रूपये दिले त्या पैशाची तो ही दारू पिणार होता. हे सचिनला माहित होते.मामूने त्याला २० रूपये दिले पण आपल्याला मात्र त्याने ३० रूपये नाहीत म्हणून सांगितले याचा त्याला राग आला. तसे तो मामूबरोबर जास्तच भांडू लागला. तुने मेरे को ३० रूपये दिए नही और उसको तुने २० रूपये दिए क्या लगता है तेरा वो म्हणत तो त्याला मारण्यासाठी त्याचे अगांवर जावू लागला. दंडोजी मात्र त्याचेकडून २० रूपये घेऊन तेथून निघून गेला. इकडे सचिनचे आणि मामूचे जोरदार भांडण सुरू झाले होते. सचिन पाटील याला मामूचा राग आला होता. तो त्याचेवर दात खिचळत ओरडत होता.तर मामू ही त्याला शिव्या देत होता. सचिनच्या रागाचा पारा चढला तसा त्याने बाजुलाच पडलेला सिमेंटचा दगड उचलला आणि मामूच्या डोक्यात जोरदारपणे घातला. त्यासरशी मामू ओरडत खाली जमीनीवर पडला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला. इकडे मामूचा खून करून सचिन पाटील हा चौकातून फिरत जात असताना रात्रीच्या गस्तीवर असणाऱ्या शिवाजी नगर पोलीसांना ११२ डायल नंबरवरून एक कॉल आला. तो कॉल आटोपता घेऊन पोलीस डेक्कन चौकातून जात असताना डेक्कन चौकात संशयावरून फिरणाऱ्या सचिन पाटील याला संशयावरून पोलीसांनी हटकले. त्याचेकडे अर्ध्या रात्री का फिरतोस असे विचारले असता तो पोलीसांना समाधानकारक उत्तरे देवू शकला नाही.पोलीसांनी त्याला खोदून खोदून विचारले असता त्याने दारूच्या नशेत आपण एकाच्या डोक्यात दगड घातला असून त्यात त्या इसमाचा मृत्यू झाल्याचे पोलीसांना सांगितले. त्याचे हातून खून झाल्याचे ऐकताच पोलीस ही चक्रावून गेले. त्याला घेऊन पोलीसांनी घटनास्थळ गाठले. तेथे एक इसम रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे दिसले. त्या इसमाच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला होता. त्याच्या शेजारी रक्ताने माखलेला सिमेंटचा दगड पडलेला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये पाठवून दिला.या घटनेची माहिती पोलीसांनी सचिन पाटील याच्याकडून घेतली होती. सदर इसमाचे नाव त्याला माहित नव्हते. मामू या नावाने तो इसम डेक्कन चौक परिसरात परिचीत होता.शिवाय तो एक फिरस्ता व भिकारी असल्याची माहिती पोलीसाना मिळाली.

सचिन पाटीलने त्याचा खून त्याला त्याने दारूसाठी पैसे न दिल्याच्या कारणातून केल्याचे कबुल केले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेत स्वत: फिर्यादी होऊन मामूच्या खूना संदर्भात सचिन लिंगाप्पा पाटील (वय २८) रा.जवाहरनगर, कोरवी गल्ली इचलकरंजी याचे विरोधात भा.दं.वी.३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला प्रथम वर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने १२ जानेवारी २०२२ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे व उप निरीक्षक इकबाल महात याच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास शिवाजी नगर पोलीस करीत आहेत.दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते परंतू दारू पिणाऱ्याला दारू प्यायला मिळाली नाही की त्याचे हात शिवशिवत असतात त्यासाठी तो हात उसणे पैसे मागत असतो पण कुणी त्याला पैसे नाही दिले की तो चिडतो आणि मग रागाच्या भरात त्याचेकडून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## व्यावसायिक स्पर्धेचा शेवट भयंकर ...

तरुणांची ओळख पाठवून घेतली. मृत तरुणाचे नाव रवी तिवारी आहे असे समजले. रवी तिवारी बरोबर कोण होत याची माहित घेण्यात आली. मयत तरुणां बरोबर आरोपी समीर असिफ मोमीन हा होता हे कळायला वेळ लागला नाही. आणि आरोपीच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी आरोपीला विचारणा केली असता आरोपी उळवा उळवीचे उत्तरे देत होता. मात्र खाकीचा हिसका दाखवताच आरोपी पोपटा सारखा बोलू लागला. मयत रवी तिवारी आणि समीर आसिफ मोमीन हे कंपनीत लेबर देण्याचे काम करीत होते. हे दोघांमध्ये काम करणारे लेबर पोहचवन्याच्या प्रयत्नात चढावोड निर्माण होऊन त्यांच्यात बऱ्याचदा वाद निर्माण होत होते. रवी तिवारीला आरोपीने गाठले आणि दारू पिण्या साठी उलन मिल कंपाउंड घेऊन गेला. त्याला खूप दारू पाजली आणि दारूच्या नशेत रवीच्या डोक्यात दगड टाकून त्याची हत्या केली.खून करणार समीर बरोबर आणखी कोणी साथीदार सहभागी आहे का याची तपास चालू आहे. असी माहिती पोलीस उपायुक्त श्री. प्रशांत मोहिते यांनी दिली. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंबरनाथ यांच्या मार्गदर्शना खाली चालू आहे.

क्राईम संध्या सोमवार दि. १० जानेवारी २०२२ ते रविवार दि. १६ जानेवारी २०२२ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ७

# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन!

**मुंबई/प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाच्या अध्वर्यू क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिवादन केले आहे. तसेच महिला व बालविकास विभागाच्या वतीने साजरा करण्यात येणारा 'सावित्री उत्सव' आणि शालेय शिक्षण विभागाच्या वतीने साजरा करण्यात येत असलेल्या जिजाऊ ते सावित्री–सन्मान महाराष्ट्राच्या लेकींचा' अभियानालाही मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. अभिवादन संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, क्रांतिज्योती सावित्रीबाई यांचे स्त्री शिक्षणासाठीचे योगदान चिरंतन असे आहे. सावित्रीबाईंच्या कर्तृत्वामुळेच स्त्रियांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला झाला. या शिक्षित पिढ्यांतून आलेल्या अनेक माता–भगिनी, विदुषींनी आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत मोठा आणि अभिमानास्पद असा वाटा उचलला आहे. आपल्या कर्तबगारीने महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे. यापुढेही स्त्रीशिक्षण, महिला सक्षमीकरण यात राज्य अग्रेसर राहील यासाठी आपण कटिबद्ध आहोत. त्यासाठी सावित्रीबाईंच्या कार्य कर्तृत्वाचा सन्मान, गौरव वाढेल याकरिता अनेकविध योजना, उपक्रम राबवण्यावर भर राहील हेच त्यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**उपमुख्यमंत्री अजित पवारांच्याकडून अभिवादन!**

क्रांतीज्योती सावित्रीबाई खऱ्या अर्थाने देशातील स्त्रीशिक्षणाच्या जननी आहेत. सावित्रीबाईंनी




स्त्रीसक्षमीकरणासाठी काम केलं. महिलांवरील अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्या सत्यशोधक विचारांच्या क्रांतिकारी समाजसुधारक होत्या. देश व देशातील स्त्रीशक्ती क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या कार्याबद्दल कृतज्ञ आहे. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या नायगाव या जन्मगावी जाऊन अभिवादन केले. सावित्रीबाईंचे जन्मगाव नायगावच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे आश्वासनही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावित्रीबाईंचे जन्मगाव नायगाव ता.खंडाळा, जि.सातारा येथे जाऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यावेळी उपुख्यमंत्री बोलत होते.

क्रांतिज्योती सावित्रीबाई यांचा जन्मदिन राज्य शासनातर्फे 'महिला शिक्षण दिन' म्हणून विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. राज्यातील जनतेला 'महिला शिक्षण दिना'च्याही उपमुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांना त्यांच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाईंची समर्थ साथ लाभली. देशात स्त्रीयांची पहिली शाळा महात्मा फुले यांनी सुरु केली आणि त्या शाळेत पहिली स्त्री शिक्षिका होण्याची जबाबदारी सावित्रीबाईंनी उचलली. स्त्रियांच्या शिक्षणासाठी या दोघांनी केलेले कार्य व घेतलेले कष्ट सदैव स्मरणात राहतील. देशातील स्त्रीशक्ती आज सर्व क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून योगदान देत आहे. स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहे, याचे श्रेय क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी त्याकाळात स्त्री शिक्षणासाठी घेतलेले कष्ट व सहन केलेल्या हालअपेष्टांना आहे. जयंतीदिनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलें यांना विनम्र अभिवादन. नायगाव येथे आयोजित कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पालकमंत्री बाळासाहेब पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार शशिकांत शिंदे, मकरंद पाटील, दिपक चव्हाण, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष उदय कबुले, उपाध्यक्ष प्रदीप विधाते, जिल्हाधिकारी शेखर सिंह, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल ,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले,प्रांतधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार दशरथ काळे ,नायगावाच्या सरपंच पूनम नेवसे आदि उपस्थित होते.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जंयतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन!**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जंयतीनिमित्त सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्य सचिव यांनी आज मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव विठ्ठल भास्कर, उपसचिव ज. जी. वळवी, कक्ष अधिकारी जयवंत पाटिल यांनीही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मीनाताई ठाकरे यांची जयंती शिवसेना बोळींज जनसंपर्क कार्यालयात साजरी!



**विरार/प्रतिनिधी**

सालाबाद प्रमाणे गुरुवार दिनांक ६ जानेवारी २०२२ रोज़ी स्वर्गीय माँसाहेब मीनाताई ठाकरे यांची जयंती ममता दिन बोळींज विभागातर्फे विभाग प्रमुख विनायक नादंविकर यांच्या विरार पश्चिम बोळींज येथील शिवसेना जन संपर्ककार्यालयात साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी उपस्थित शिवसेना विरार महिला शहर समन्वयक वंदना नादंविकर यानी माँसाहेबांच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यांना विनम्र अभिवादन केले. तसेच महिला शिवसैनिक भारती गायकवाड यांनी माँसाहेबांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण केला. तसेच सर्व महिला आघाडी पदाधिकारी महिला शिवसैनिक पुरुष पदाधिकारी यांनी माँसाहेबांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले. त्याप्रसंगी उपस्थित बोळींजचे विभाग प्रमुख विनायक नांदविकर, एमबी इस्टेट विभाग प्रमुख आनंद नाईक, बोळींजचे शाखा प्रमुख सुरेश रॉड्रिग्ज, दत्ताजी शिंदे, नंदाखाल शाखाप्रमुख लाॅरेन मचाडो, सचिन म्हात्रे, महिला विभाग संघटक अमिता शिंदे, शाखा संघटक संगीता नाईक, उपशाखा संघटक सुप्रिया साळुंखे, शुभांगी शानबाग, ज्योस्ना शिंदे, रेखा पंजाबी, प्रिती पटेल, जेष्ठ शिवसैनिक माधव सोमासे, रंगनाथ गुरव, भरत शिवसैनिक व महिला आघाडी उपस्थित होते.

# सुप्रसिद्ध सियाराम ब्रँडच्या नवे विक्री केला जाणारा कोट्यवधी रुपयांचा बनावट कपडा साठा जप्त

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी ग्रामीण भागात असलेल्या गोदामां मध्ये मोठ्या प्रमाणावर मालाची साठवणूक करण्यात येत असताना त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बनावट साहित्य साठविलेले आढळून येत असत. अशाच पद्धतीने सियाराम या सुप्रसिद्ध कपड्याच्या ब्रँड चे लोगो वापरून बनावट कपडा विक्री करण्यासाठी साठविलेले असताना कॉपीराईट कायद्या अंतर्गत कारवाई करीत कोट्यवधी रुपयांचा कपडा जप्त केला आहे.

राहनाळ ग्रामपंचायत क्षेत्रातील अंजुरफाटा येथील धारणी आर्केट या ठिकाणी चौधरी टेक्स्टाईल्स नावाने असलेल्या गोदामात मोठ्या प्रमाणावर सियाराम या सुप्रसिद्ध कापड उत्पादक कंपनीच्या लेनीन या ब्रँड चे कापड साठविल्याची माहिती इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन अँटी पायरेसी सेल चे रामजीत गुप्ता यांनी नारपोली पोलीस ठाण्यात वरिष्ठ पो निरीक्षक मदन बल्लाळ यांना कळविली असता पोलिसांनी गोदमावर छापा मारला असता त्या ठिकाणी बनावट कपड्याच्या किनारीवर



सियाराम लेनिन असे ब्रँड लिहलेले २६५ रुपये मीटर प्रमाणे विकला जाणार १ कोटी १ लाख १७ हजार ४३५ रुपयांचा ३८ हजार १७९ मीटर कपडा जप्त करीत गोदाम चालक जमाल अहमद कमरुद्दीन खान व गुरुचरण सतनाम सिंग या दोघां विरोधात फसवणूक व कॉपीराईट कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेला २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे. या योजनेकरिता सन २०२०–२१ व २०२१–२२ मधील पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः ऑफलाईन अर्ज भरून परिपूर्ण अर्ज इतर कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई शहर यांच्याकडे २८ फेब्रुवारी २०२२ पर्यत पाठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असणाऱ्या परंतू, प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडेतत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामधील प्रवेशित मुलां–मुलीप्रमाणे भोजन भत्ता, निवास भत्ता, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत नियमानुसार पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रती वर्षी ६० हजार इतकी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट शासनामार्फत जमा करण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः ऑफलाईन अर्ज भरून परिपूर्ण भरलेला अर्ज इतर कागदपत्रांसह २८ फेब्रुवारी २०२२ पर्यत पाठवावा, असे आवाहन समाधान इंगळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# भिवंडीत एकाच रात्री दोन आगीच्या घटना, आगीत दोन कामगार होरपळले

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी परिसरात एकाच रात्री मोजेच्या कारखान्याला आग लागली तर पहाटेच्या सुमारास ब्ल्यू डार्ट च्या गोदामाला पहाटे भीषण आग लागून त्यामध्ये दोन कामगार होरपळून जखमी झाल्याच्या दोन घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ माजली होती. पहिल्या आगीच्या घटनेत भिवंडी तालुक्यातील दापोडा येथील इंडियन कॉर्पोरेशन मधील सॉक्स (मोजे) बनवण्याच्या कारखान्याला काही वेळा पूर्वीच भीषण आग लागली असून अग्निशमक दलाच्या ३ गाडया घटनास्थळी दाखल होऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला यामध्ये महागड्या मशीन आणि सॉक्सचा कच्चा माल आणि महागडे सॉक्स जळून खाक झाला आहे. या कारखान्यासमोर लोकवसाहत आणि माजी सरपंचाचे घर असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या आगीचे कारण अद्याप समजू शकले नसून यामध्ये जीवितहानी झाली नाही मात्र नुकसान मोठे झाले आहे. तर दुसऱ्या घटनेत दापोडा येथील मोजेच्या कारखान्याला



रात्री लागलेली भीषण आग विझल्यानंतर मुंबई – नाशिक महामार्गावरील वडपे येथील ब्ल्यू डार्टच्या गोदामाला पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याने या आगीत दोन कामगार भाजल्याने जखमी झाले आहेत यावेळी तेथील ढाब्यावरील कामगारांनी धाव घेऊन कामगारांना काही कामगारांना बाहेर काढून जखमी दोघांना रुग्णालयात पाठवले असून याची माहिती मिळताच अग्निशमक दलाने घटनास्थळी जाऊन दिड तासाने आग आटोक्यात आणली आहे, आगीचे कारण समजू शकले नसून यामध्ये दोन कामगार भाजल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे मात्र एकाच रात्री दोन आगीच्या घटना घडल्याने भिवंडीत खळबळ माजली आहे.

# भिवंडीत भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची भात विक्रीसाठी झुंबड

**भिवंडी/आकाश गायकवाड**

राज्य शासनाच्या खरेदीविक्री महासंघाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात ३१ जानेवारी पर्यत भात खरेदी सुरू राहणार असली तरी भिवंडी तालुक्यातील दुगाडफाटा येथील खरेदी विक्री महासंघाच्या गोदमावर शेतकऱ्यांची भात विक्री साठी झुंबड उडाल्याने तेथील गोदाम कर्मचाऱ्यांची त्रेधातिरपीट उडाली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा, बापगाव, लोनाड, अंबाडी, दिघाशी, चिंबीपाडा या भागात आज ही मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जात असून त्यावर अनेकांचा उदरनिर्वाह होत आहे. शेतकऱ्यांना हमीभाव देऊन भात खरेदी करण्या साठी शासन स्तरावर खरेदीविक्री महासंघास शेतकऱ्यांना कडील साधारण प्रतीचा भात १९४० रुपये प्रति क्विंटल हमीभाव देऊन ३१ जानेवारी पर्यत ऑनलाईन नावनोंदणी केलेल्या शेतकऱ्यां कडून खरेदी करण्याचा निर्णय घेतला असताना भिवंडी तालुक्यात सध्या दुगाडफाटा येथील एकमेव भातखरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची झुंबड उडाली आहे. तालुक्यातील हिवाळी शेतीमाल खरेदीविक्री सहकारी सोसायटी लि. व झिडके



येथील जय किसन भात गिरणी या दोन सहकारी संस्थांना भात खरेदीसाठी खरेदीविक्री संघाने मान्यता दिली असून झिडके येथील भात खरेदी बंद असल्याने सर्व शेतकऱ्यांनी आपला मोर्चा दुगाडफाटा येथे वळविल्याने या ठिकाणी खरेदी केलेला भात साठवणुकीची सुध्दा गैरसोय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुगाडफाटा येथील भातखरेदी केंद्रावर तब्बल २२०० शेतकऱ्यांनी भात विक्री साठी नोंदणी केली असून आतापर्यंत ६५० शेतकऱ्यांचे १६ हजार क्विंटल भात खरेदी केल्याची माहिती गोदाम व्यवस्थापक लहू घोडविंदे यांनी देत ३१ जानेवारी पर्यत भात खरेदीस शासनाने परवानगी दिल्याने या काळात आपला भात विक्री होणार नाही या भीतीने शेतकरी भात घेऊन केंद्रावर दाखल होत आहेत अशी महिती लहू घोडविंदे यांनी दिली. शासनाने भात खरेदी साठी अधिक संस्थांना संधी देण्याची गरज असून झिडके व पडघा येथील साठवणूक क्षमता कमी असल्याने त्यांच्या भात खरेदीस मर्यादा आल्या असून त्यामुळे दुगाडफाटा येथील केंद्रावरील ताण वाढला असल्याचे बोलले जात आहे .तर गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षी देखील ३१ मार्च पर्यत भात खरेदी करण्याची मुदत मिळावी त्याच प्रमाणे बोनस देखील जाहीर करावा अशी मागणी शेतकरी शिवाजी राऊत यांनी शासनाकडे मागणी केली आहे.

# ग्राम सुरक्षा यंत्रणाच्या संदेशान्वये तुळजापूर येथुन चोरीस गेलेली चारचाकी क्रुझर वाहन व त्या मधील ३ मोबाईल हॅन्डसेट हस्तगत

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण बपोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, पोलीस यांचे संकल्पनेतुन सोलापूर ग्रामीण जिल्हयातील कार्यरत असलेल्या पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावात एखादा मालाविषयक गुन्हयाचा प्रकार घडले नंतर गुन्हयातील आरोपी यांचा शोध होणे करीता व गुन्हयाना तात्काळ प्रतिबंध बसावा या करीता कार्यान्वीत केलेल्या ग्राम सुरक्षा यंत्रणाव्दारे संदेश देऊन गावातील नागरिक व सोलापूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाणे कडील अधिकारी, अंमलदार यांना सतर्क करण्यात येत आहे. तुळजापूर येथुन चारचाकी क्रुझर गाडी क्रमांक एम.एच १२ यु ७६७०ची चोरी झाली होता. त्या बाबत वैराग पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक परजने यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणाव्दारे संदेश देऊन सदरचे वाहन हे वैराग येथुन सोलापूरच्या दिशेने येत असले बाबत कळविले होते. सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी अरूण फुगे यांनी सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांना




तुळजापूर येथुन झालेल्या चोरीच्या गुन्हयातील क्रुझर वाहना बाबत शोध घेण्याच्या सूचना देऊन त्यांचे सोबत पोलीस अंमलदार यांना मदती करीता दिले होते. त्याप्रमाणे सपोनि नेताजी बंडगर व त्याचे सोबत असलेले पोलीस अंमलदार याचेसह चोरीस गेलेल्या क्रुझर चार चाकी वाहनाचा वैराग–सोलापूर मार्गावर शोधार्थ होते. सदरची क्रुझर गाडी मौजे गावडी दारफळ, उत्तर सोलापूर येथील नागरिकाच्या मदतीने सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस आणुन लावुन त्या क्रुझर वाहना बाबत खात्री करणे करीता तुळजापूर पोलीस ठाणे कडील संबंधीत गुन्हयाचे तपासिक अंमलदार यांना बोलावुन घेऊन त्याची खात्री झाले नंतर गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने क्रुझर वाहन व त्या वाहना मध्ये मिळुन आलेले ३ मोबाईल असा ७ लाख १३ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल तुळजापूर येथील संबंधीत गुन्हयाचे तपासिक अंमलदार याचे ताब्यात देण्यात आला आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी अरूण फुगे याचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, पोलीस नाईक श्रीराम आदलिंग यांनी बजावली आहे.

# भंगसालपाडा येथील विहिरीत आढळला मृतदेह

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भंगसाल पाडा येथील विहिरीत ४ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास एका तरुणाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. येथील नागरिकांनी तात्काळ वाडा पोलिसांना कळवले असता वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दीपक ढुस यांनी सहकाऱ्यांसोबत घटना स्थळाला भेट देऊन मृतदेह विहिरीतून बाहेर काढून उपस्थितांमध्ये चौकशी केली असता व्यवसायाने टेलर असलेल्या जमीर शेख (वय २५) याचा असल्याचे निष्पन्न झाले. अधिक माहिती घेतली असता मयताच्या वडिलांनी त्याला काल संध्याकाळी ४ वाजता पाहिले होते त्यानंतर तो दिसला नसल्याचे सांगितले. दरम्यान वाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून अधिक तपासा वाडा पोलीस करत आहेत.

# प्रशासनाने उपोषणकर्त्यांच्या मागण्या मान्य केल्याने उपोषण मागे

**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेच्या कामगारांनी विविध मागण्यांसाठी कोका कोला कंपनीच्या विरुद्ध तहसीलदार कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले होते. अनंता मेणे, तुषार पाटील, अशोक पाटील, लक्ष्मण कामडी रमेश ठाकरे हे आमरण उपोषणाला बसले होते. मात्र तीन दिवस झाले तरी कंपनी प्रशासन त्यांची दखल घेतली नसल्याने त्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी शुक्रवारी काही कामगारांनी मुंडन करून निषेध व्यक्त केला व कंपनी विरोधात घोषणा दिल्याने शुक्रवारी रात्री तहसील कार्यालयात बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला.

शुक्रवारी वाडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील, वाडा तालुक्याचे



नायब तहसीलदार अनिल लहांगे, कामगार कार्यालयाचे दीपक बोडके, कंपनीचे व्यवस्थापक रुपेश परदेशी, लोखंडे, रंजन खिराडे, कंत्राटदार धनंजय चौधरी, नासिर सुसे, कामगार संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जितेश उर्फ बंटी पाटील, स्वाभिमान संघटनेचे तालुकाध्यक्ष रवींद्र मेणे व कामगारांचे शिष्टमंडळ यांच्यात दीर्घकाळ चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला. दरम्यान शनिवारी सकाळी कंपनी प्रशासनाने कामगारांच्या मागण्या मान्य केल्याचे जाहीर केल्याने उपोषण कर्त्यांनी उपोषण मागे घेतले.

# वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरली

**ठाणे/प्रतिनिधी**

सोनसाखळी चोरांनी एका वृद्धेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि माळेचा काही भाग हिसका देऊन लांबवल्याचा प्रकार कळव्यातील पारसिकनगरमध्ये घडला असली तरी या प्रकारामध्ये ही वृद्ध तोल जाऊन पडली. भरदुपारी हा प्रकार घडला असून या प्रकारानंतर रस्त्यावरून पायी जाणेही सुरक्षित राहिले नसल्याचे दिसून येत आहे. पारसिकनगरमध्येच राहणारी ही वृद्धा दुपारी पतीसह बँकेत पैसे काढण्यासाठी निघाली होती. चालत येथील बस थांब्याच्या दिशेने जात असताना दाम्पत्य रस्ता ओलांडण्यासाठी थांबले. त्यावेळी अचानक त्यांच्या दिशेने एक दुचाकी आल्याने घाबरलेले हे दाम्पत्य बाजूला होत असतानाच दुचाकीवर मागे बसलेला चोर वृद्धेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि माळ खेचू लागला. परंतु वृद्धेने मंगळसूत्र पकडून ठेवल्याने चोराने वृद्धेला जोरदार हिसका दिला आणि चोर मंगळसूत्र तसेच माळेचा काही भाग खेचून पारसिकनगरच्या दिशेने पळून गेले. नंतर मुलासोबत वृद्धेने पोलिस ठाण्यात जाऊन या प्रकाराविषयी तक्रार केली. चोरांनी एकूण ३० हजारांचे दागिने लांबवले असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.




## १५ ते १८ वयोगटातील लसीकरणाचा शुभारंभ संपन्न

# जिल्ह्यातील १,६८,९१२ मुलांना लस देण्याचे उद्दिष्ट

**पालघर/प्रतिनिधी**

१५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणास आज पासून सुरुवात झाली असून चहाडे येथील स्वर्गीय श्रीमती तारामती हरिश्चंद्र पाटील विद्यालय येथे जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हा परिषद अध्यक्षा वैदही वाढाण मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सांबरे, पालघर पं.स. सभापती रंजना म्हसकर, जि.प.सदस्य नीता पाटील, जिल्हा पेईन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सानिका रजनीकांत पाटील, विश्रामपुर या पंधरा वर्षीय आशा स्वयंसेविकेच्या मुलीस लस देऊन लसीकरणास सुरुवात करण्यात आली. शाळा व महाविद्यालयापासून लसीकरणाची सुरुवात करण्यात येणार असून १५ ते १८ वयोगटातील एकूण १,६८,९१२ मुलांना लस देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती यावेळी डॉ.अभिजित खंदारे यांनी दिली. सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी हा शुभारंभ होत असून ही आनंदाची गोष्ट आहे आरोग्य विभाग, आशा, अंगणवाडी स्वयंसेविका यांच्या मुळे ही मोहीम यशस्वी होईल असे मत यावेळी अध्यक्ष वाढाण यांनी व्यक्त केले.तसेच प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी लसीकरण गरजेचे असून लसीकरणाबाबत कुठलीही भीती मनात बाळगू नका असे उपस्थित विद्यार्थ्यांना सांगून कोरोना ची तिसरी लाट आपण थोपवू शकतो असा विश्वास व्यक्त करून रुग्णांची संख्या वाढत असल्याने कोरोनाचे सर्व नियम पाळा आणि कुठल्याही अफवांवर जनतेने विश्वास ठेवू नये असे आवाहन वैदेही वाढाण यांनी केले. लहानपणी जे लसीकरण झालं आहे त्याचाच हा भाग असून आता कोव्हिडंच्या पार्श्वभूमीवर ही लस देण्यात येणार आहे. त्यामुळे मुलांनी घाबरून जाण्याचे कारणं नाही असे प्रतिपादन यावेळी मु.का.अ. यांनी केले. यानंतर मासवण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीची पाहणी करून लवकरात लवकर इमारतीचे उद्घाटन करण्यात यावे अशा सूचना अध्यक्ष वाढाण यांनी केल्या. यावेळी चहाडे ग्रामपंचायतिच्या सरपंच, आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी कर्मचारी अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, आशा, अंगणवाडी सेविका उपस्थित होते.



वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातील १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिंनीना करोना प्रतिबंधक लसीकरण सुरू आहे. महाविद्यालयाचे प्राध्यापकांच्या देखरेखीखाली वसई-विरार महापालिकेकडून ही लसीकरण मोहिम राबविली जात आहे. या मोहिमेला गेल्या तीन-चार दिवसांपासून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे.

## देवणी येथे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकारीतेचे आद्य जनक अचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त गुरुवार दि.६ जानेवारी रोजी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले देवणी तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने देवणी येथील विवेक वर्धिनी विद्यालयात दर्पण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष दर्पण दिनानिमित्त सखोल अशी माहिती विषद केली. व तसेच पत्रकार लक्ष्मण रणदिवे यांनी मनोगत व्यक्त केले तर आभार अमरदीप बोरे यांनी मानले यावेळी देवणी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश कोतवाल, प्राचार्य गोपीनाथ सगर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे देवणी तालुकाध्यक्ष सतिश बिरादार, दत्ता पाटील, अन्वरखाँ पठाण, रेवण मळभागे, बालाजी टाळीकोटे, जाकीर बागवान, महेश कनजे, बालाजी कवठाळे, प्रमोद लासोने, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे, अमरदीप बोरे, प्रा. एस.जी.दाभाडे, सी.व्हि. काळे, उपसरपंच गजानन गायकवाड यांच्यासह आदी उपस्थिती होती.

## श्री भोगेश्वर विद्यालयातील ५८ विद्यार्थ्यांना कोव्हिडचे लसीकरण



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील मौजे तळेगाव (भो) येथील श्री भोगेश्वर विद्यालयात आजादी का अमृतमहोत्सव या निमित्ताने दि. ५ जानेवारी २०२२ रोजी १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना कोविड १९ चे लसीकरण करण्यात आले. या लसीकरणात वयोगटातील ५८ पात्र विद्यार्थ्याचे लसीकरण करण्यात आले. यावेळी तळेगावचे सरपंच सदाशिव रामचंद्रराव पाटील, मुख्याध्यापक सुनील क्षीरसागर, ग्रामसेवक गोरे एस.आर. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सी एच ओ डॉ. गुंडरे प्रमोदीनी, ए एन एम बनसोडे डी डी, एम.पी.डब्लू, शिंदे एस पी,डाटा ऑपरेटर नितीन कांबळे, आशा वर्कर्स बबीता पाटील, सुरवसे आर बी व आरोग्य सेविका बालीका माचे आदी उपस्थित होते. या लसीकरणासाठी शिंदे बालाजी, माने व्ही एन, श्रीमती कणजे यु एस, रामासने डी आर,सौदागर एम बी बिरादार बी डी, पटवारी आर व्ही, भोसले ए आर, दत्ता पाटील आदीनी परीश्रम घेतले.

## वसई विरार महानगर पत्रकार संघातर्फे बाळ शास्त्री जांभेकर यांना मानवंदना!

**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार महानगर पत्रकार संघातर्फे आज सायंकाळी वसई येथे आयोजित पत्रकार दिन समारंभात आद्य समाजसुधारक, तथा मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक स्व. बाळशास्त्री जांभेकरांना मानवंदना देण्यात येऊन, त्यांच्या एकंदर योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. प्रबोधन, लोकशिक्षण आणि सामाजिक जागृतीच्या उद्देशाने दर्पणकार बाळ शास्त्रींनी सुरु केलेली पत्रकारिता व्यवसायनिष्ठा आणि स्पर्धेच्या रेट्यात आज प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करीत असून, तिचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी जांभेकर, लो. टिळक, आगरकर यांचे आदर्श समोर ठेवून मार्गक्रमण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन 'वसई विरार महानगर पत्रकार संघां'चे अध्यक्ष अनिलराज रोकडे यांनी यावेळी केले. प्रारंभी पत्रकार संघांचे पदाधिकारी, तथा दै. लढाई न्यायासाठीचे संपादक झाकीर मेस्त्री यांच्या हस्ते स्व. बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, त्यांच्या स्मृतींना मानवंदना देण्यात आली. अनिष्ट रूढी, परंपरा या विरोधात जनजागृती करीत, विधावांच्या पुनरविवाहासाठी चळवळ उभी करणाऱ्या स्व. जांभेकरांनी जातीभेद, वर्णभेद, सामाजिक विषमता, महिला दास्य, बाल विवाह, अंधश्रद्धा या विरोधात दर्पण मधून रणशिंग फुंकले. लोकशिक्षण आणि सामाजिक जागृतीला पुरक वातावरण निर्माण व्हावे, म्हणून ग्रंथालय उभारण्यात पुढाकार घेऊन वाचक चळवळ रुजवली. पहिले संपादक, पहिले प्राध्यापक, पहिले प्रकाशक, संशोधक, संस्कृत, विज्ञान आणि गणित विषयातील तज्ज्ञ अश्या विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या जांभेकरांना दुर्दैवाने आयुष्य खूप कमी लाभल्याची खंत रोकडे यांनी यावेळी व्यक्त केली. स्व. बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रज राजवटीतील प्रतिकूल कालखंडात दर्पणच्या माध्यमातून जनतेला स्वाभिमान, स्वावलंबन आणि स्वातंत्र्याचे बाळकडू पाजले. अज्ञान, विषमता यातून निर्माण झालेली सामाजिक दरी मिटविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा परिश्रमपूर्वक प्रयत्न केला. त्यांनी घालून दिलेले आदर्श आणि त्यांचे योगदान पत्रकारितेतील नव्या पिढीला विसरून चालणार नाही, असे प्रतिपादन झाकीर मेस्त्री यांनी यावेळी केले. सूत्रसंचालन जयराज राजीवडे यांनी, तर आभार प्रदर्शन बसंत आग्रहारी यांनी केले.



## जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा माहिती कार्यालयामध्ये मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी गंगाधर जामनिक, योगेश गायकवाड, लौकिक जाधव व बाबू पवार यांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण'हे मराठी भाषेतील पहीले वृत्तपत्र काढून मराठी वृत्तपत्रांचा पाया रचला. पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून 'दर्पण'च्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकरांनी समाजात नवी जीवनमुल्ये रूजविण्यात मोलाचे योगदान दिले. बाळशास्त्री जांभेकरांच्या या योगदानासाठी त्यांचा जन्मदिन मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.



पत्रकार दिनानिमित्त वसई तालुका पत्रकार संघाचे सचिव आशिष राणे यांनी प्रकाशित केलेल्या संस्कृती पुस्तिकेचे व नितांत राऊत यांच्या वाइल्ड फोटोग्राफीने सजलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. आघाडीचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील, वसई विरार महानगरपालिकेचे माजी अध्यक्ष पंकज ठाकूर, पत्रकार संघाचे खजिनदार अरुण सिंह, किरण पाटील शिवकुमार शुकला आदी उपस्थित होते.

## पुणे येथील राष्ट्रस्तरीय ज्युनियर किकबॉक्सिंग स्पर्धेत २३ खेळांडूंनी जिंकली १७ सुवर्ण, १३ रौप्य आणि १६ कांस्य पदकं

**वसई/प्रतिनिधी**

ऑल इंडिया कॅडेट आणि ज्युनियर किकबॉक्सिंग २०२१ चॅम्पियनशिप स्पर्धा २१ ते २५ डिसेंबर दरम्यान बॉक्सिंग हॉल, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल, बालेवाडी स्टेडियम पुणे महाराष्ट्र येथे कोव्हिड-१९ सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करून घेण्यात आली. या स्पर्धेचे संपूर्ण आयोजन किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार यांनी वाको इंडियाचे प्रेसिडेंट संतोष अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली केले. या स्पर्धेमध्ये एकूण २७ राज्यांचा समावेश होता व सुमारे १५०० मुले आपले कौशल्य दाखवण्यासाठी या स्पर्धेत सहभागी झाले होते. यात वसई-विरार भागातील एकूण २३ मुला-मुलींनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत पालघर डिस्ट्रीक असोसिएशनच्या २३ खेळाडूंनी १७ सुवर्ण, १३ रौप्य व १६ कांस्य अशी एकूण ४६ पदक पटकावून आपल्या पालघर जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. या विजयी खेळाडूंची नावे पुढील प्रमाणे - अग्रीमा देवलाल २ गोल्ड, १ सिल्वर, कार्मेलिना फर्नांडिस २ गोल्ड, १ सिल्वर, स्मित गांगेकर २ गोल्ड, १ ब्रॉन्झ, स्टीयाना वेसावकर २ गोल्ड, प्रिती पाटील २ गोल्ड, धैर्य अहिरे २ गोल्ड, शौर्य मुंडापाट १ गोल्ड, २ सिल्वर, १ ब्रॉन्झ, सानवी पाटील १ गोल्ड, १ सिल्वर, १ ब्रॉन्झ, वेदांन्त मच्छीवाल १ गोल्ड, १ सिल्वर, १ ब्रॉन्झ, अक्षिता देवलाल १ गोल्ड, १ सिल्वर, प्रथम गांधी १ गोल्ड, १ ब्रॉन्झ, सोहम मच्छीवाल २ सिल्वर, २ ब्रॉन्झ, मिराया जोशी १ सिल्वर, २ ब्रॉन्झ, राहुल कुबतीया १ सिल्वर, १ ब्रॉन्झ, चेरीश रॉड्रिग्ज १ ब्रॉन्झ, क्रिझेल रॉड्रिग्ज १ ब्रॉन्झ, कायलीन रॉड्रिग्ज १ ब्रॉन्झ, मयुरेश चौगुले १ सिल्वर, रेहान शेख १ ब्रॉन्झ, सलोनी फरेल १ ब्रॉन्झ, शुभम कांबळी १ ब्रॉन्झ तर मायरॉन डिमोन्टी व आर्यन लोपीस यांचा सहभाग होता. स्पर्धकांमधील बहुतेक मुलांना सुर्यप्रकाश मुंडापाट सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण मिळाले आहे. तर काहींना रीतेश प्रजापती व अक्षय वेरनेकर सर यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. तसेच प्रशिक्षिक सागर भोईर, सायली कानत व सिद्धांत मुंडापाट यांनी स्पर्धकांच्या मागे अतोनात मेहनत घेतली. सर्व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली असून विजयी खेळाडूंवर वसई तालुक्यात कौतुकाचा वर्षाव होत आहे.



